# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक १४ मार्च, २०१६ / फाल्गुन २४, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **परिवहन मंत्री** | |
| **(३)** | **ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ११०**

---

### औंढा नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यातील इनामी जमिनी मूळ मालकांच्या नावे करण्याबाबत

**(१) * १६००८ श्री.रामराव वडकुते, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंढा नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यात पूर्वीच्या सर्व्हे नंबर १४६, १४७, २५८ व सध्याचा परिवर्तीत सर्व्हे नंबर ३८० वर इनामी जमिनी मूळ मालकांना देण्याबाबतचे आदेश शासन परिपत्रक क्र.डीईव्ही २०१०/प्र.क्र.९/ल-४, दिनांक ३० जुलै, २०१० रोजी झाले असून सदर जमिनी मूळ मालकांना देण्यात आल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर इनामी जमिनी मूळ मालकांच्या नांवे करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) शासन परिपत्रक क्र.डीईव्ही-२०१०/प्र.क्र.९/ल-४, दिनांक ३०.७.२०१० व शुद्धीपत्रक समक्रमांक दिनांक २९.६.२०११ अन्वये इनाम जमिनी मूळ मालकांना परत करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या नसून देवस्थानच्या जमिनी बेकायदेशीर रित्या हस्तांतरीत झाल्या असल्यास अशा जमिनी पूर्ववत देवस्थानच्या नावे करणेबाबत क्षेत्रीय महसूली अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहेत.

औढा नागनाथ, जि.हिंगोली येथील जुना स.नं.१४६, १४७, २५८ (सद्याचा गट नं.३८०) या जमिनीच्या बाबतीत नमूद करण्यात येते की, सदर जमीन हैदराबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबतचा अधिनियम, १९५४ मधील तरतूदी अन्वये संबंधित इनामदारांकडून खालसा होऊन कब्जेदार श्री.गोविंदराव देशमुख यांना १९६० साली पुनर्दानित झाली होती.

तद्नंतर अपील प्रकरणी सदर पुनर्दानित जमीन ही सेवाधारी इनाम जमीन (Community Services Inam) असल्याचे विशेष कार्य अधिकारी, महसूल व वन विभाग यांनी १९६४ साली घोषित केले.

तथापि, सदर जमीन पुढे "वक्फ मिळकत" म्हणून महाराष्ट्र शासनाचे राजपत्र दिनांक ११.७.१९७४ मध्ये अधिसूचित झाल्याचे दिसून येते. संबंधित इनामदारांनी प्रश्नांकित जमीन वक्फ करुन देताना सदर सेवाधारी इनाम जमीन अनधिकृत ताब्यात असल्याचे शपथेवर कथन केल्याचेही सदर राजपत्रात नमूद केले आहे.

प्रश्नांकित जमीन खालसा झाल्यानंतर संबंधित इनामदारांनी ती वक्फ केल्याचे दिसून येते. या प्रकरणी वक्फ (सुधारणा) अधिनियम, १९९५ मधील कलम ४० नुसार कोणतीही मालमत्ता वक्फ आहे किंवा कसे हे ठरविण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास आहे. त्यानुसार प्रश्नांकित जमीन वक्फ आहे किंवा कसे हे याबाबत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडून खातरजमा करण्यात येईल.

----------------

## टेंभापुरी, लिंबेजळगांव (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) या गावातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाबाबत

**(२) * १४८७४ श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेंभापुरी, लिंबेजळगांव (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) या गावासह २३ गावातील प्रकल्पग्रस्त शेतक-यांना शासनाने दिलेली आश्वासने पुर्ण करण्यात आली नसल्याने सदर गावातील प्रकल्पग्रस्त शेतकरी माहे मार्च, २०१५ पासुन ठिय्या आंदोलन करत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आंदोलकांकडे शासनाने साधी चौकशीही केली नसल्याने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यासह पुनर्वसन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

टेंभापूरी प्रकल्पामुळे बाधित प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन देय नागरी सुविधांनी युक्त गावठाणात करण्यात आले आहे. लिंबेजळगाव येथील नागरी सुविधा जिल्हा परिषदेस हस्तांतरित करण्यात आल्या असून शिवराई येथील सुविधांच्या हस्तांतरणाची कार्यवाही सुरू आहे. उपरोक्त ठिय्या आंदोलनाचे अनुषंगाने प्राप्त निवेदनातील विविध मागण्यांबाबत आंदोलनकर्त्यांसह मा.मंत्री (म.व पु.) विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांचे स्तरावर बैठका घेण्यात आलेल्या असून, पुनर्वसनाशी संबंधित तसेच देय मागण्यांबाबत विहीत मुदतीत नियमानुसार कार्यवाही करणेबाबत संबंधित विभाग/अधिकाऱ्यांना निर्देशित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पीक विमा धोरणात नुकसान भरपाईची तरतुद करण्याबाबत**

**(३) * १४७०७ श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने शेतकऱ्यांच्या नवीन पीक विमा धोरणाला मंजूरी देऊन विम्याचा हप्ताही कमी करण्यात आला, मात्र अवकाळी पाऊस, गारपीट व वन्य प्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसान भरपाईची या धोरणात तरतूद नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले. तद्नुसार सदर पीक विमा धोरणात नुकसान भरपाईची तरतुद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) खरीप हंगाम २०१६ पासून प्रधानमंत्री फसल विमा योजना (PMFBY) ही नवीन पीक विमा योजना राज्यात राबविणेबाबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना प्राप्त झाल्या असून सदर योजना लागू करण्यासंदर्भातील प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन आहे.

सदर योजनेतंर्गत काढणी पश्चात पिकांचे होणारे नुकसान याबाबी अंतर्गत काढणी/कापणी नंतर चक्रीवादळ, अवकाळी पावसामुळे पीकांचे नुकसान झाल्यास सदर नुकसानीस विमा संरक्षण देण्याची तरतुद आहे. त्याचप्रमाणे, शेतात पुराचे पाणी आल्याने होणारे नुकसान, भुस्खलन व गारपीट या स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीस देखील विमा संरक्षण देण्याची तरतुद आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(४) * १५९६६ श्री.अमरसिंह पंडित, श्री.रामराव वडकुते, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे, डॉ.अपूर्व हिरे, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, डॉ.सुधीर तांबे, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.अनिल भोसले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.जयंत पाटील, श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.राजेंद्र जैन, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शरद रणपिसे, श्री.सुभाष झांबड, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.सुनिल तटकरे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी तसेच लातूर, नांदेड, नाशिक, जळगाव, धुळे, यवतमाळ, जालना, चंद्रपूर व सांगली जिल्ह्यात नापिकी, दुष्काळ परिस्थिती, अवर्षण, गारपीट, अवकाळी पाऊस, निसर्गाच्या लहरीपणा, कर्जबाजारीपणा आणि बेरोजगारीला कंटाळून मागील वर्षभरात राज्यात ३२२८ शेतकरी आत्महत्या झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांजोर (ता.जि.धुळे) येथील शालीग्राम पाटील आणि वाळकी, ता.चोपडा येथील अशोक गिरधर धनगर या शेतकऱ्यांनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये तर खरपुडी (ता.जि.जालना) येथील शेषराव सखाराम शेजूळ या ४० वर्षीय शेतकऱ्याने कर्जबाजारीपणा व सततच्या नापिकीमुळे स्वत: अंत्यविधीचे निमंत्रण देऊन दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ व जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौजे मारवाडी (ता.नेर, जि.यवतमाळ) येथील शेतकऱ्यांनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये व मौजे आमनी (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथील शेतकरी श्री.मिथून शिवदास राठोड यांनी शेती नापिकी व कर्जामुळे दिनांक ०६ ऑगस्ट, २००९ रोजी आत्महत्या केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अमरावती विभागात ११७९, औरंगाबाद विभागात ११३० शेतकऱ्यांनी तर नाशिक जिल्ह्यात ४२६, जळगांव जिल्ह्यात १३६, सांगली जिल्ह्यात १९८८, चंद्रपूर जिल्ह्यात १२३ व मराठवाड्यात ११०९ शेतकऱ्यांनी गतवर्षात आत्महत्या केल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असून राज्यात दि.१ ऑक्टोबर, २०१४ ते जानेवारी, २०१६ पर्यंत किती शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, त्यापैकी किती महिला शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत,

(५) असल्यास, दुष्काळाने संपूर्ण राज्य होरपळून गेले असतांना यवतमाळ जिल्हयात होत असलेल्या आत्महत्या यामुळे हिवाळी अधिवेशनात शासनाने ३,५८७ कोटी चे निधी (पॅकेज) जाहीर केले असून मदतीच्या पहिल्या टप्यात शासनाने २ हजार कोटी रुपये दिले यातील केवळ ५ लाख रुपये यवतमाळ जिल्ह्याच्या वाट्याला आले असून इतर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना वितरीत केलेल्या अनुदानाची जिल्हानिहाय संख्या व रक्कम किती आहे,

(६) असल्यास, आत्महत्याग्रस्त ३२२८ पैकी ९०३ शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत देण्याचे प्रस्ताव अपात्र ठरवण्यात आले तर ४८४ प्रस्ताव प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, शासनाकडून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना एक लाख रुपयांची मदत सन २००५ सालापासून देण्यात येते, परंतु, एक लाख मदतीमधून फक्त रोख ३० हजार रुपयांचा चेक दिला जातो व राहिलेल्या ७० हजार रुपयांचे बचत प्रमाणपत्र देण्यात येते, त्यांचे पैसे ५ वर्षांनी दिले जाते, हे ही खरे आहे काय,

(८) असल्यास, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांच्या वारसांना १ लक्ष रुपये सानुग्रह अनुदानामध्ये वाढ करून ही रक्कम २ लक्ष रुपये करावी अशी मागणी लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(९) असल्यास, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना इतर राज्यांमध्ये रुपये चार लाख नुकसान भरपाई मिळते त्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाने सुद्धा राज्यातील आत्महत्याग्रस्त कुंटुंबाच्या मदतीमध्ये वाढ करावी असे मा. उच्च न्यायालयाने शासनास दिनांक २२ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निर्देश दिले, हे ही खरे आहे काय,

(१०) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून राज्यातील शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना वाढीव आर्थिक मदत व निधी देणेबाबत, सानुग्रहात वाढ करण्याबाबत, कर्जमाफी तसेच राज्यातील वाढत्या शेतकरी आत्महत्या रोखण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(११) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यात जानेवारी, २०१५ ते डिसेंबर, २०१५ या कालावधीत ३२२८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या त्यापैकी १८४१ प्रकरणे शेती संकटामुळे झाल्याने त्यांना पात्र ठरवून मदत करण्यात आली आहे.

(२) धुळे जिल्ह्यात श्री.शालीग्राम संतोष पाटील, राहणार सांजोरी, तालुका, जिल्हा धुळे या शेतकऱ्याने दिनांक २८.१२.२०१५ रोजी आत्महत्या केलेली आहे. तर जळगाव जिल्ह्यातील वाळकी, तालुका चोपडा येथील अशोक गिरीधर धनगर या शेतकऱ्याने दिनांक २९.१२.२०१५ रोजी नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केलेली आहे.

तथापि या नाशिक विभागातील शेतकऱ्यांनी स्वत: अंत्यविधीचे निमंत्रण देऊन आत्महत्या केली असल्याची बाब खरी नाही.

(३) मौजे मारवाडी, ता.नेर येथील विशाल नामदेव पवार यांनी दिनांक १७.१२.२०१५ रोजी विहीरीत उडी घेऊन आत्महत्या केली आहे. सदर मृतकाचे वारसास मदत देण्यात आली आहे.

मौजे आमनी, तालुका आर्णी येथील मिथुन शिवदास राठोड, यांनी दिनांक ६.८.२००९ रोजी विष प्राशन करुन आत्महत्या केली आहे. सदर प्रकरण जिल्हा समितीने चालू कर्ज असल्यामुळे अपात्र घोषित केले आहे.

(४) होय.

दिनांक १ ऑक्टोबर, २०१५ ते जानेवारी, २०१६ पर्यंत विभाग निहाय शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

नाशिक विभाग-६६१, त्यापैकी १२ शेतकरी महिलांनी आत्महत्या केली आहे. अमरावती विभाग-अमरावती विभागामध्ये एकूण १५३६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत त्यापैकी १२४ महिला शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. पुणे विभाग-पुणे विभागात एकूण ५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. कोकण विभाग-कोकण विभागातील ३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. औरंगाबाद विभाग-औरंगाबाद विभागात १४५४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. त्यापैकी ६७ महिला शेतकरी आहेत.

(५) होय.

शासनाच्या दिनांक २.१.२०१६ च्या आदेशान्वये एकूण २१ जिल्ह्यामध्ये ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी आलेल्या बाधित गावातील शेतकऱ्यांच्या प्राप्त माहितीनुसार रुपये ३५७८.४३ कोटी एवढ्या मंजूर निधी पैकी रुपये २००० कोटी एवढा निधी वितरीत करण्यात आला आहे.

(६) होय.

(७) होय.

(८) व (९) अशाप्रकारची मागणी लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्त्यांनी केली असल्याचे दिसून येत नाही. परंतु मा.उच्च न्यायालयाने आत्महत्या झालेल्या शेतकऱ्याला योग्य ती मदत देण्यात यावी अशी सुचना केली आहे.

(१०) कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन अंतर्गत सर्व गरजु शेतकऱ्यांना अन्न सुरक्षा योजना, आरोग्य सुविधा, राजीव गांधी जीवनदायी योजनेचा लाभ देण्यात येत आहे. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांच्या मुलांना मोफत शिक्षणाची योजना, जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत कामे, म.न.रे.गा. अंतर्गत कामे तसेच शेती विकासासंदर्भात शासनाच्या विविध विभागामार्फत उपाययोजना करण्यात येत आहेत.

(११) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खाजगी वीज कंपनीचे ५७२ कोटी रुपयांचे वीज शुल्क माफ केल्याबाबत**

**(५) * १४९३६ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र विद्युत अधिनियम ५अ चे उल्लंघन करून खाजगी वीज कंपनीचे ५७२ कोटी रुपयांचे वीज शुल्क माफ करण्याचा बेकायदेशीररित्या निर्णय घेतला असल्याचे दिनांक १४ ऑक्टोंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार वीज कंपन्यांकडून वीज शुल्काची वसुली करण्यासाठी तसेच संबंधितावर जबाबदारी निश्चित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महाराष्ट्र वीज शुल्क अधिनियम, १९५८ मधील ५ क नुसार सार्वजनिक हिताच्यादृष्टीने राज्य शासनास विद्युत शुल्कातून सवलत देण्याचे अधिकार आहेत. त्यानुसार जे.एस. डब्लू इस्पात या कंपनीला उद्योग विभागाच्या सामूहिक प्रोत्साहन योजना, १९९३ च्या आधारे दि. २९.१२.१९९९ च्या अधिसूचने अन्वये, पात्रता प्रमाणपत्रात नमूद केलेल्या कालावधीकरीता विद्युत शुल्क माफी देण्यात आली होती. तद्नंतर उद्योग संचालनालयाच्या दि. ६.१०.२०१२ च्या आदेशानुसार सदर सामूहिक प्रोत्साहन योजनेच्या सवलतीचा कालावधी आणखी ७ वर्षांनी वाढविण्यात आला. त्या आदेशाच्या आधारे विद्युत शुल्क सवलतीचा कालावधी वाढविण्याची कंपनीची मागणी होती. सदर कंपनीच्या मागणीच्या अनुषंगाने ऊर्जा विभागाने सवलतीचा कालावधी दि. ५.८.२०१९ पर्यंत वाढविण्याकरिता नस्ती विधी व न्याय विभाग तसेच वित्त विभागाकडे सहमतीसाठी पाठविली होती. त्यावर वित्त विभागाने काही मुद्दे उपस्थित केले होते. ही नस्ती उपस्थित मुद्यांचे निराकरण करुन परत वित्त विभागाकडे पाठविण्याऐवजी त्याबाबतचे आदेश निर्गमित झाले. ही बाब लक्षात आल्यानंतर सदर आदेशाची अंमलबजावणी होण्यापूर्वीच त्यास स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकरणी शासनाचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही. तसेच सदर कंपनीच्या वाढीव कालावधीतील सवलतीची संभाव्य विद्युत शुल्काची रक्कम रु. ५७२ कोटी नसून ती सुमारे रुपये २६ कोटी होते.

(२) व (३) विद्युत शुल्क माफीच्या या प्रकरणी घडलेल्या चुकीची भविष्यात पुनरावृत्ती होवू नये. यासाठी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धुळे जिल्ह्यात कृषी विद्यापीठ स्थापन करण्याबाबत

**(६) * १६११५ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यात कृषी विद्यापीठ व्हावे, अशी लोकप्रतिनिधी व जनतेकडून मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उत्तर महाराष्ट्राचे मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या धुळे या जिल्ह्यात कृषी विद्यापीठ स्थापन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) व (३) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला या दोन कृषि विद्यापीठांचा विस्तार विचारात घेऊन त्याचे विभाजन करुन स्वतंत्र कृषि विद्यापीठ देणे आवश्यक आहे का याची तपासणी करुन यासंदर्भात शासनास मार्गदर्शन करण्यासाठी दिनांक १९.८.२०१३ च्या शासन निर्णयान्वये डॉ.वाय.एस.पी.थोरात माजी अध्यक्ष नाबार्ड यांचे अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती नेमण्यात आली होती.

सदर समितीने आपला अहवाल दिनांक ६.१.२०१५ च्या पत्रान्वये शासनास सादर केला होता. सदरच्या अहवालावर कार्यवाही करण्यासाठी काही आर्थिक, तांत्रिक व प्रशासकीय बाबींची माहिति घेणे आवश्यक ठरते. त्यामुळे या दोन विद्यापीठांचे विभाजन करण्याकरीता लागणारा आवश्यक तपशिल प्राप्त करण्याकरीता दिनांक १४.५.२०१५ च्या शासन निर्णयान्वये डॉ.वेंकटेश्वरलू, कुलगुरू, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. सदर समितीने दिनांक २९/१२/२०१५ च्या पत्रान्वये आपला अहवाल शासनास सादर केला आहे.

सदरच्या अहवालावर यथोचित कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे.

-----------------

## पुण्यातील वाघोली येथील दुय्यम निबंधक कार्यालयात दस्तनोंदणीसाठी मोठ्या प्रमाणात फी आकारत असल्याबाबत

**(७) * १५८५२ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील वाघोली येथील दुय्यम निबंधक कार्यालयात दस्तनोंदणीसाठी मोठ्या प्रमाणात फी आकारत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दस्त नोंदणीसाठी नागरीकांची लूट होवू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील मराठी माध्यमाच्या विनाअनुदानित व अनुदानित सर्व शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करण्याबाबत**

**(८) * १५९४८ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १२४६३ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या दिनांक २६ जून, २०१५ च्या आदेशानुसार राज्यातील शासकीय शैक्षणिक संस्थांसाठी वीज दराकरिता सार्वजनिक सेवा वर्गवारी अंतर्गत स्वतंत्र उपवर्गवारी लागू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालय, मुंबई प्रविष्ट याचिका क्रमांक ८२७०/२०१३ ची सुनावणी करतांना दिलेल्या आदेशात सार्वजनिक मुंबई विश्वस्त कायदा - १९५० अन्वये धर्मादाय आयुक्त यांचेकडे नोंदणीकृत संस्था संचलित अनुदानित व विनाअनुदानित शाळा-महाविद्यालये शैक्षणिक संस्था तसेच प्रशिक्षण संस्थांना यापुढे वीज बिलात आकारले जाणारे वीज शुल्क (Electrcity Duty) आकारले जाऊ नये व सर्व शाळा-महाविद्यालयांना सवलतीत वीज पुरवठा करण्यांत यावा, असे मा.न्यायालयाने सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात शैक्षणिक कार्यात योगदान देणाऱ्या व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था कायदा-१९५० अंतर्गत नोंदणीकृत संस्था संचलित सर्वच शैक्षणिक शाखा-उपशाखांना सवलतीचे दराने वीजपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, राज्यातील शासकीय शैक्षणिक संस्थांसाठी वीज दराकरिता सार्वजनिक सेवा वर्गवारी अंतर्गत स्वतंत्र उपवर्गवारी लागू केले पश्चातही शाळा-महाविद्यालयांना वीज दरात विशेष सवलतीचा लाभ होत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मा.उच्च न्यायालयाचा निर्णय व सर्व शाळा-महाविद्यालयांना थेट निवासी दराने वीज बिलाची आकारणी करावी अशी मागणी शासनाकडे करण्यात येत असल्याने उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मा.उच्च न्यायालय यांचे आदेशानुसार शिक्षण संस्थांना मुंबई वीज शुल्क अधिनियम १९५८ यांच्या कलम ३ (iii a) नुसार विद्युत शुल्कापासून सुट मिळण्यासाठी पुनश्च: धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी करण्याची गरज नाही. मात्र सदर आदेशात सर्व शाळा, महाविद्यालयांना सवलतीच्या दराने वीज पुरवठा करण्यात यावा असे कुठेही नमूद करण्यात आलेले नाही.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील आरटीओ कार्यालयात पीयूसी मशीन वापराविना पडून असल्याबाबत**

**(९) * १५१७८ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आर.टी.ओ. कार्यालयात सन २००० ते २०१५ या कालावधीत अवजड वाहन सक्षम आहेत का याची तपासणी करुन कार्यालयाकडून फिटनेस प्रमाणपत्र सादर करण्यासाठी १२० पीयूसी मशीन पुरवठा करण्यात आले असता सदर पीयूसी मशीन वापराविना तशीच पडून असल्याचे दिनांक ३ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पीयूसी मशीन आरटीओ कार्यालयास उपलब्ध करुन देऊनही त्यांचे वापर न होण्याची कारणे कोणती आहेत,

(३) असल्यास, सदर मशीन खरेदीसाठी झालेला खर्च वाया गेल्याने त्याबाबत संबंधित दोषींवर कारवाई करण्यात येणार आहे काय ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) नाही.

सन २००० ते २०१५ पर्यंत केंद्र शासनामार्फत १६८ गॅस ॲनालायझर व १६८ स्मोक मीटर पुरविण्यात आले आहेत. सन २०१० पासून भारत स्टेज-४ ही वायु प्रदुषणाचे मानके लागू आहेत. वायु प्रदुषण विषयक सुधारीत मानकांनुरुप पूर्वी पुरविलेल्या मशीन्स कालबाहय झालेल्या आहेत.

मे. मॅनाटेक इलेक्ट्रॉनिक प्रा.लि. यांचेकडून ५० स्मोक मीटर वा मे. इंडस प्रा.लि. यांचेकडून ५० गॅस ॲनालायझर केंद्र शासनाच्या अनुदानातून प्राप्त झाले. सदर यंत्राचे राज्यातील ५० परिवहन कार्यालयांना प्रत्येकी १ स्मोक मीटर व १ गॅस ॲनालायझर असे वाटप करण्यात आले आहे. सदर मशीन्स परिवहन कार्यालयांना माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये पुरविण्यात आल्या आहेत. उत्पादक कंपनीच्या तज्ञाकडून सदर मशीन्सचे कॅलिब्रेशन/ इन्टॉलेशन्स करुन यंत्र हाताळणीचे प्रात्यक्षिक अद्यापी देण्यात आले नाही. संबंधीत कंपनीच्या तज्ञ व्यक्तींकडून सदर मशीनचे इन्स्टॉलेशन्स करुन यंत्र हाताळणीचे प्रात्यक्षिक दिल्यानंतर सदर मशीन्सचा वापर वायु प्रदुषण विषयक तपासणीसाठी करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महावितरण तर्फे राज्यातील शेतकऱ्यांना पुरवावयाच्या "सौर कृषी पंप" खरेदी प्रक्रियेबाबत

**(१०) * १५२२४ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.संदिप बाजोरिया, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या मा.मुख्यमंत्र्यांनी ५ वर्षात ५ लाख सौरऊर्जेवरील कृषीपंप शेतक-यांना पुरविण्याचा महात्वाकांक्षी जाहिर केला व प्रायोगिक तत्त्वावर सुमारे १० हजार कृषी पंपाची निविदा प्रक्रिया माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान पार पडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या सौरपंप वाटपाच्या महत्वाकांक्षी योजनेसाठी ३ व ५ अश्वशक्तीसह विविध क्षमतेच्या सौरपंपाची खरेदी केली जाणार असून सुमारे साडेतीन ते साडेपाच लाख रुपयांपर्यंत किंमत असलेले वेगवेगळ्या क्षमतेचे सौरकृषी पंप खरेदी करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गुजरात राज्याने माहे जुलै, २०१५ मध्ये सौरकृषी पंपासाठी ५ अश्वशक्तीचा पंप सुमारे साडेतीन लाख रुपयांना खरेदी करण्यात आले असून राज्य शासनामार्फत खरेदी करण्यात येणाऱ्या १० हजार सौरपंपासाठी प्रती पंप साडेचार लाख मोजत असल्यामुळे गुजरातपेक्षा राज्याकडून प्रत्येक पंपामागे किमान लाखभर रुपये जादा मोजावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निविदेत अंतिम करण्यात आलेले दर हे इतर राज्यांच्या (गुजरात, आंध्र प्रदेश, तेलंगणा) तुलनेत सुमारे दिड ते दोन लक्ष रुपयांनी अधिक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) आपल्या राज्यात प्रति सौरपंप एक ते दीड लाख रुपये जादा दराने खरेदी करण्याची कारणे काय आहेत,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे, या योजनेअंतर्गत ३ व ५ अश्वशक्तीचे डीसी व ३, ५ व ७.५ अश्वशक्तीचे एसी सौरकृषीपंप खरेदी केले जाणार असून त्याची मूळ निर्धारित किंमत ३.२४ ते ७.२० लाख रुपयांपर्यंत आहे.

(३) होय, हे अंशत: खरे आहे, गुजरात राज्याने माहे जुले, २०१५ मध्ये सौरकृषी पंपासाठी ५ अश्वशक्तीचा पंप हा ३,९८,०००/- इतक्या रुपयांना खरेदी करण्यात आले असून राज्य शासनामार्फत खरेदी करण्यात येणाऱ्या पंपापैकी ५ अश्वशक्ती पंपासाठी सर्वात कमी अंतिम प्राप्त झालेले दर रु. ५,०१,२००/- इतका आहे. त्यानुसार ५ अश्वशक्ती पंपामागे रु. १,०३,२००/- इतका फरक आहे. सद्य:स्थितीत एकही सौर कृषीपंप खरेदी केलेला नाही.

(४) होय, हे अंशत: खरे आहे. गुजरात राज्याच्या सौर कृषीपंप दरांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्याच्या सौर कृषीपंप निविदेमधील सर्वात कमी अंतिम प्राप्त झालेले दरानुसार ३ अश्वशक्ती एसी पंपामध्ये रु. ४४,०००/- व ५ अश्वशक्ती एसी पंपामागे १,०३,२००/- इतका फरक आहे. तसेच, आंध्रप्रदेश राज्याच्या तुलनेत ३ अश्वशक्ती एसी पंपामध्ये रु. (१२,३७०/-) व ३ अश्वशक्ती डीसी पंपामध्ये रु. ३,७००/- तसेच, ५ अश्वशक्ती एसी पंपामध्ये रु. ७२,२००/- व ५ अश्वशक्ती डीसी पंपामध्ये रु. ३१,२००/- इतका फरक आहे.

(५) निविदेमध्ये काटेकोर गुणवत्ता व कार्यक्षमता तपासणी देयकाच्या रकमेसंदर्भीच्या अटी, रिमोट मोनिटरींग यंत्रणा आणि सौर पॅलन वॉरंटीसाठी घेण्यात येणारी परफॉर्मन्स बॅक गॅरेंटी या गोष्टींचा प्रामुख्याने अंतर्भाव असल्याने सौर कृषीपंपाची गुणवत्ता कार्यक्षमता व कार्याचा कालावधी यामध्ये वाढीची शाश्वती दिसून येते व यामुळे, महाराष्ट्र राज्याच्या सौरकृषीपंप निविदेमध्ये प्राप्त झालेल्या दरांमध्ये फरक दिसून येतो.

(६) गुजरात राज्यातील सौरकृषीपंप प्रकल्प, ई-निविदा प्रक्रिया, प्राप्त दर यांतील फरक व त्यांची कारणमीमांसा यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्रातील अधिकाऱ्यांनी गुजरात राज्याचा दौरा करुन त्याचा सविस्तर अहवाल महाराष्ट्र शासनास सादर केला आहे. सदर अहवालानुसार, या निविदेमध्ये असलेल्या काटेकोर गुणवत्ता व कार्यक्षमता तपासणी, देयकाच्या रकमेसंदर्भीच्या अटी, रिमोट मोनिटरींग यंत्रणा आणि सौर पॅलन वॉरंटीसाठी घेण्यात येणारी परफॉर्मन्स बॅक गॅरेंटी या गोष्टींचा प्रामुख्याने अंतर्भाव असल्याने सौर कृषीपंपाची गुणवत्ता कार्यक्षमता व कार्याचा कालावधी या मध्ये वाढीची शाश्वती दिसून येते व यामुळे महाराष्ट्र राज्याच्या सौरकृषीपंप निविदेमध्ये प्राप्त झालेल्या दरांमध्ये फरक दिसून येतो.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सांगली जिल्हयातील प्रलंबित वीज जोडण्या देण्याबाबत**

**(११) * १६१९२ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयात मागणीपेक्षा दुप्पट वीजनिर्मीती होत आहे, दर महिन्यात सुमारे ६०० मेगावॅट वीजेची मागणी असताना विविध स्त्रोतांपासून १२५३ मेगावॅट विजेची निर्मिती होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपूर्ण जिल्हयात २६ हजार वीज जोडण्यांची प्रकरणे प्रलंबित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, २६ हजार वीज जोडण्यांची प्रकरणे प्रलंबित असण्याची कारणे कोणती, त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, स्थानिक अधीक्षक अभियंता, सांगली यांनी याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(४) असल्यास, वीज पुरविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी १६७ कोटींचा आराखडा शासनास सादर केला आहे काय, त्याबाबत शासनाने सदर आराखडयास मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले.

(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने प्रलंबित २६ हजार वीज जोडण्या देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सांगली जिल्हयाची दरमहा सुमारे ४५० मेगावॅट इतकी वीजेची मागणी आहे. तसेच सांगली जिल्हयातील एकूण अपारंपारीक ऊर्जा स्त्रोतांपासून सरासरी मासिक २८३.१० मेगावॅट इतकी वीज निर्मिती होत आहे.

(२) हे खरे आहे. दि. १५.०२.२०१६ अखेर घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक, कृषी वर्गवारीतील प्रलंबित वीज जोडण्याची संख्या २१,१०५ इतकी आहे.

(३) पायाभूत आराखडा-२ योजनेतून प्रलंबित असलेल्या वीज जोडण्या देण्याचे काम सध्या चालू आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आचरा गाव (जि.सिंधुदुर्ग) येथील देवस्थान इनाम जमिनी भोगवटादारांच्या नावे करण्याबाबत**

**(१२) * १४८५४ श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आचरा गाव (जि.सिंधुदुर्ग) येथील देवस्थान इनाम जमिनी भोगवटादारांच्या नावे व्हाव्यात या मागणीसाठी आचरा ग्रामस्थानी गेल्या अनेक वर्षापासून शासनाकडे तसेच जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्याकडे पाठपुरावा करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देवस्थान इनाम जमिनी भोगवटादारांच्या नावे करण्याबाबत योग्य कार्यवाही न झाल्यास रास्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी तहसिलदार, कुडाळ व जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना लेखी निवेदनाद्वारे दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) सरपंच, ग्रामपंचायत आचरा यांनी दिनांक २६.११.२०१४ रोजी उपविभागीय अधिकारी कुडाळ यांचेकडे निवेदन दिलेले आहे.

(३) व (४) सदर विषयाबाबत जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी दिनांक ४.१२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे अहवाल सादर केला असून त्यानुषंगाने अहवालाची छाननी करुन नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शेतकऱ्यांना सोळा तास वीज पुरवठा उपलब्ध करून देण्याबाबत**

**(१३) * १५२८२ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना सध्या आठ तास वीज उपलब्ध करण्याचे नियोजन असून ते वाढवून सोळा तास करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय, निर्णयाचे स्वरुप काय आहे व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, निर्णय घेण्यात आला नसल्यास विचाराधीन असलेल्या प्रस्तावाचे स्वरुप काय आहे व त्यावर निर्णय घेण्यासाठी अजून किती कालावधी लागणे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

राज्यातील शेती सिंचनासाठी देण्यात येणाऱ्या वीज उपलब्धतेबाबत दि. २८.०३.२०११ रोजी तत्कालीन मा. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस तत्कालीन मा. उप मुख्यमंत्री, प्रधान सचिव (ऊर्जा), महाराष्ट्र वीज नियामक आयोग व महावितरणचे अधिकारी तसेच, ग्राहक प्रतिनिधी हजर होते. पाण्याचे योग्य ते नियोजन करण्यासाठी तसेच कृषी पंपासाठी आवश्यक असलेला विद्युत पुरवठा लक्षात घेवुन पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे ठरले.

१) कृषी ग्राहकांना दररोज आठ तास ३ फेज वीजेची उपलब्धता चक्राकार पध्दतीने देण्यात यावी.

२) ज्या वेळी वीजेची उपलब्धता जास्त असले तेव्हा कृषी ग्राहकांना रात्रीच्या काळात १० तास व दिवसा ८ तास वीजेची ३ फेज उपलब्धता चक्राकार पध्दतीने देण्यात यावे. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

तसेच, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार राज्यातील कृषी वाहिनीवरील कृषी ग्राहकांना रात्रीच्या काळात १० तास व दिवसा ८ तास ३ फेज उपलब्धता चक्राकार पध्दतीने देण्यात येत आहे. दिवसा व रात्री देण्यात येणारी वीजेची उपलब्धता स्थानिक कृषी ग्राहकांच्या सोईनुसार आठवडयातून दोन वेळेस किंवा प्रत्येक आठवडयास चक्राकार पध्दतीने देण्यात येते.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती व प्रगत तंत्र ज्ञानाचे प्रशिक्षण देण्याबाबत**

**(१४) * १६१४८ श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.संदिप बाजोरिया, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती व प्रगत तंत्र ज्ञानाचे प्रशिक्षण देण्यासाठी १० वर्षापूर्वी सन २००५ मध्ये "आत्मा" ही योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेसाठी केंद्र शासनाच्या ९० टक्के व राज्य शासनाचा १० टक्के निधी या प्रमाणात अनुदान उपलब्ध करुन दिले जात होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाने अनुदान न दिल्यामुळे "आत्मा " चे कामकाज बंद होण्याच्या मार्गावर आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आत्मा या संस्थेकडून केले जाणारे कार्य विचारात घेता संस्थेला भरीव स्वरुपात अनुदान उपलब्ध करुन देण्याचेदृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) व (३) सन २०१४-१५ पर्यंत आत्मा योजनेसाठी केंद्र व राज्य हिश्याचे प्रमाण ९०:१० असे होते. सन २०१५-१६ पासून सदरचे प्रमाण केंद्र शासनाने केंद्र व राज्य ६०:४० असे केले आहे. त्यामुळे राज्यावरील आर्थिक भार पूर्वीच्या तुलनेत ३० टक्केने वाढला आहे. सदर योजनेसाठी केंद्राकडून रु. १२१२.७१ लक्ष व प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (आत्मा घटक) अंतर्गत रु. २९६.२३ लक्ष इतके अनुदान प्राप्त झालेले आहे. त्यास अनुरुप राज्य हिश्याची रक्कम जिल्हा नियोजन समितीमार्फत वितरीत करण्यात आली आहे. त्यामुळे "आत्मा" चे कामकाज बंद होण्याच्या मार्गावर आहे, ही बाब खरी नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

------------------------------

## वसई (जि.पालघर) येथे दारुची होत असलेली निर्मिती व तस्करी बंद करण्याबाबत

**(१५) * १५६८० श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.रामराव वडकुते, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) येथे दारुची निर्मिती व बेकायदा होत असलेली तस्करी याबाबत पोलिसांनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान ड्रोन धाड टाकली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धाडीत काय आढळून आले व तद्नुसार दारू निर्मिती करणाऱ्यांवर व दारुची तस्करी करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, वसई येथे दारूची होत असलेली निर्मिती व तस्करी बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) सदर धाडीमध्ये दोन इसम भट्टीतून गळणारी दारू एका प्लॅस्टीकच्या ड्रममध्ये काढून घेत असल्याचे निदर्शनास आले. फरार आरोपी तुषार पाटील व जयेश म्हात्रे राहणार मालजीपाडा यांच्याविरुध्द वालीव पोलीस ठाणे यांच्याकडे गुन्हा रजि. क्र.III ३०/२०१५ मुंबई प्रोव्हीबीशन कायदा कलम ६५ (फ), ६६ (१) ब प्रमाणे दि. २९/१२/२०१५ अन्वये नोंद असून सदरचा गुन्हा पोलीस तपासावर आहे.

(३) पोलीस निरीक्षक, वालीव पोलीस ठाणे यांनी अवैध दारुची निर्मिती व तस्करी करणारे इसमांविरुध्द दारुबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल करुन त्यांच्याविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून मुंबई प्रोव्हीबीशन कायदा कलम ९३ प्रमाणे १६ प्रस्ताव व ४ इसमांविरुध्द एम.पी.डी.ए अन्वये प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे मंजूरीसाठी पाठविले आहेत. राज्य उत्पादन शुल्क, ठाणे विभागाने माहे डिसेंबर, २०१५ ते २२ फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत अवैध दारु धंद्यांविरोधात एकूण ६८ गुन्हे नोंदविले असून त्यात ३५ वारस, ३३ बेवारस व ३६ आरोपींना अटक करुन रु.२२,६८,५५२/- किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---------------------

**पुना क्लब ली. पुणे चे नुतनीकरण करण्याबाबत**

**(१६) * १६१६२ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुना क्लब ली. पुणे या जागेवरील भाडे करार हा २०१२-२०१३ रोजी संपलेला आहे व तो आजपर्यंत नुतनीकरण झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, पुणे यांनी मागील २ वर्षांचे प्रतीवर्षी रूपये १०० कोटी पेक्षा जास्त भाड्याच्या रक्कमेची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) पुना क्लबची आजीवन सभासद फी २० ते ३० लाख रूपये इतकी असताना शासकीय अधिकाऱ्यांना केवळ काही हजार रूपयांमध्ये प्रती वर्षी ५ अधिकारी याप्रमाणे आजीवन सभासदत्व देण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(४) प्रती वर्षी ५ अधिकाऱ्यांना आजीवन सभासदाऐवजी प्रतीवर्षी १५ सभासद घेण्याची अट टाकून पुना क्लबची हजारो कोटी रुपयांची मध्यवर्ती ठिकाणी असलेली जागा कुठलेही सार्वजनिक हित न जपता नुतनीकरणाचा प्रस्ताव शासनाने पुना क्लबला दिलेला आहे काय,

(५) असल्यास, पुना क्लब ली. ची संपूर्ण जागा ही महाराष्ट्र शासनाच्या मालकीची असून त्याचे नुतनीकरण करताना शासनाने तेथे सर्वसामान्य नागरीकांना व लोकप्रतिनिधींना प्रवेश देण्याची व क्लबच्या सुविधा उपभोगण्याची अट टाकणार आहे काय,

(६) असल्यास, मागील करारातील बऱ्याचशा अटीचे उल्लघंन पुना क्लबने केल्याने शासनाची शेकडो कोटी रुपयांचे जे नुकसान झालेले आहे ते झालेले नुकसान वसूल करून सदर जागा शासनाच्या ताब्यात घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) पुना क्लब लि.यांना पूर्वी भाडेपट्याने दिलेल्या बंडगार्डन रोड येथील शासकीय जमिनीचा भाडेपट्टा सन २०१३ मध्ये व मौजे येरवाडा येथील शासकीय जमिनीचा भाडेपट्टा सन २००७ मध्ये संपलेला आहे. सदर दोन्ही जमिनीच्या भाडेपट्यास शासन ज्ञापन दिनांक ३०/११/२०११ व दिनांक १२/७/२०१३ अन्वये ३१/७/२०३७ पर्यंत काही अटी/शर्तीवर मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर शासन ज्ञापनामधील निर्देशानुसार भाडेपट्टा नूतनीकरण करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सुरु आहे.

(२) जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक ४/११/२०१५ च्या पत्रान्वये विषयांकित जमीन भाडे कराराविना सदर संस्थेच्या ताब्यात राहिल्याने सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या दोन वर्षाच्या बाजारमुल्याच्या रक्कमेच्या प्राईम लेंडीग दरानुसार १०% प्रमाणे होणारी रक्कम रु. २३४,७९,८१,८१८/- भाडे रक्कमेपोटी शासन जमा करण्याबाबत पुना क्लब लि.यांना कळविले आहे.

(३) दि. ३०/११/२०११ व दि. १२/०७/२०१३ रोजीच्या शासन ज्ञापनांमध्ये जिल्हाधिकारी पुणे हे शिफारस करतील अशा किमान १५ अधिकाऱ्यांना प्रतिवर्षी संस्थेचे कायमस्वरुपी सदस्यत्व देणे पुना क्लबवर बंधनकारक असल्याबाबतची अट विहित केली आहे. मात्र सदस्यत्व फी बाबतचा निर्णय पुना क्लब लि. यांच्या सर्वसाधारण सभेत घेण्यात येतो.

(४) पुना क्लब लि. यांना पूर्वी भाडेपट्टयाने दिलेल्या शासकीय जमिनीच्या भाडेपट्टयास शासन ज्ञापन दि. ३०/११/२०११ व १२/०७/२०१३ अन्वये सन २०३७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर बाब महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४० च्या अनुषंगाने शासनाच्या अधिकारीतेत आहे.

(५) विषयांकित जमिनीच्या भाडेपट्टयास वरीलप्रमाणे सन २०३७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून त्यामध्ये अशी अट समाविष्ट नाही.

(६) पुना क्लब लि. यांनी भाडेकरारतील अटी/शर्तीच्या केलेल्या उल्लंघनाबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांनी रु.२,५३,३९,५२४/- इतकी दंडात्मक रक्कम शासनजमा करणेबाबतचा आदेश पारीत केला असून त्यानुसार पुना क्लब लि. यांनी दंडात्मक रक्कम शासन जमा केली आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शेतक-यांना खुल्या बाजारातून विविध निविष्ठा मिळण्याबाबत

**(१७) * १५१३८ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित व मे.बाजोरिया महिद्रा ॲण्ड महिद्रा ट्रॅक्टर्स चे अधिकृत विक्रेते यांच्या किंमतीतील फरकावरुन शेतक-यांना खुल्या बाजारातून विविध निविष्ठा मिळण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१४-२०१५ ते २०१५-२०१६ या कालावधीकरीता महिद्रा ॲण्ड महिद्रा ट्रॅक्टर चे मोठे व वाढलेले दरपत्रक शासनाने मान्य केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन मान्य असतांनाही मोठया फरकाने कमी दरामध्ये ट्रक्टर पुरविण्यास व सुविधा देण्यास अधिकृत विक्रेते तयार होतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे शेतक-यांची अप्रत्यक्षपणे फसवणूक होत असल्यामुळे शेतक-यांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अकोला (तत्कालिन) यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शेतक-यांना न्याय देण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) महिंद्रा अँड महिंद्रा ट्रॅक्टरच्या दरातील फरकाबाबत कोणतेही निवेदन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अकोला यांना प्राप्त झालेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासींच्या नावावर असलेला भूखंड खाजगी विकासकाला देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१८) * १५७१७ श्री.संदिप बाजोरिया, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड, मुंबई पश्चिमेकडील लिंकिंग रोड परिसरातील भुमी क्लासिक या खाजगी विकासकाच्या गृह प्रकल्पाचा मुळ भूखंड हा आदिवासींच्या नावावर असतानासुध्दा महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील तरतूदीनुसार सदरची मिळकत शासन जमा करणेबाबत जिल्हाधिकारी मुंबई, उपनगर यांनी दि. १३/०४/२०१५ रोजी आदेश पारित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे आदेश पारित केलेले असतानासुध्दा मुळ भूखंड विकासकाच्या नावे केल्यामुळे मा.महसूल मंत्र्यांनी दिनांक ०८ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास दोषी अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक ०९ जुलै, २०१५ रोजी वा त्या सुमारास शासनाने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना त्वरीत अहवाल सादर करण्याविषयी सुचना दिल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी चौकशी अहवाल शासनास सादर केलेला असतानाही शासनाने त्याविषयी कोणतीही कारवाई केलेली नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार २५७ रहिवाशी विस्थापीत होणार असून त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत तसेच, उक्त प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) मौ.मालाड, ता.बोरीवली येथील स.नं.५०४ अ (पै), न.भू.क्र.१४०६ जी/१(पै) या मिळकतीबाबत श्री.गणपत भागल्या तांबोळी व मे.एव्होरा बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स प्रा.लि. यांच्यामध्ये दिनांक २९/२/१९९६ रोजी करार झालेला होता. सदर करार हा महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ३६ अ च्या पोटकलम (१) मधील तरतुदीच्या विरोधात असल्याने प्रस्तुत प्रकरणी झालेले हस्तांतरण अवैध असल्याचे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक १३/४/२०१५ रोजीच्या आदेशान्वये जाहीर केले आहे.

(२), (३), (४) व (५) प्रश्नाधीन प्रकरणी शासनाची परवानगी नसताना आदिवासी जमिनीच्या व्यवहाराची नोंद अधिकार अभिलेख्यात घेण्यात आली होती काय? असल्यास तशी नोंद अधिकार अभिलेख्यामध्ये घेण्यास कोण जबाबदार आहे, त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा, अशा सूचना शासन पत्र, महसूल व वन विभाग, दिनांक ९/७/२०१५ अन्वये जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना देण्यात आल्या होत्या.

प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक १/१२/२०१५ रोजीच्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर केला आहे. या अहवालाच्या अनुषंगाने अधिक माहिती जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडून मागविण्यात आली आहे.

(६) प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी २५७ सदनिका धारकांना सुनावणीची संधी देऊन, दिनांक १३/४/२०१५ रोजी आदेश पारीत केले आहेत. सदर आदेशाविरुध्द विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे अपिल दाखल करण्यात आले असून सदर प्रकरण सुनावणीसाठी प्रलंबित आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरामध्ये कार रजिस्ट्रेशनसाठी स्मार्टकार्ड देण्याबाबत

**(१९) * १५५३० श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सतेज (बंटी) पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरामध्ये कार रजिस्ट्रेशनसाठी स्मार्टकार्ड देण्यात येत होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजना बंद करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजना पुर्ववत सुरु करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) होय, स्मार्टकार्ड नोंदणी प्रमाणपत्र छपाईकरिता सेवा पुरवठादार सोबतचा करार संपुष्टात आल्यामुळे दिनांक २७/११/२०१४ पासून उक्त योजना बंद करण्यात आली आहे.

(३) स्मार्ट कार्ड नोंदणी प्रमाणपत्र देण्याकरिता विभागातर्फे दिनांक ३०/६/२०१५ रोजी वित्तीय निविदा प्रसिध्द करण्यात आली. परंतु एका निविदाकाराने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन दाखल केल्यामुळे सदर प्रकरण सद्य:स्थितीमध्ये न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मुस्लिम समाजास आरक्षण देण्याबाबत

**(२०) * १४९८३ ॲड.निरंजन डावखरे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ११७८३ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुस्लिम समाजास आरक्षण देण्याबाबत ॲड जनरल यांचे मार्गदर्शन घेऊन आरक्षण देण्यात येईल अशी घोषणा मा.मुख्यमंत्री महोदयांनी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरण अंतिम निर्णयासाठी मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंतिम निर्णयासाठी मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या मुस्लिम समाजास आरक्षण देण्याबाबत अंतिम निर्णय झाला आहे काय,

(४) असल्यास, मा.उच्च न्यायालयाकडून अंतिम निर्णय होण्याचेदृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) होय.

(३) नाही.

(४) व (५) शासनाने सामान्य प्रशासन विभाग, दि. ९ जुलै, २०१४ रोजीच्या अध्यादेशाद्वारे मुस्लिम समाजासाठी ५% आरक्षण देण्यात आले होते. याबाबत मा.उच्च न्यायालयाने दि. १४/११/२०१४ रोजी अंतरिम निर्णय दिला असून उपरोक्त अध्यादेश अस्तित्वात असेपर्यंत शासकीय व अनुदानित शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशासाठी व शासकीय सेवेतील भरतीसाठी दिलेले आरक्षण अबाधित ठेवण्यात आले आहे. सदर अध्यादेशाचे दिनांक २३/१२/२०१४ पर्यंत कायद्यात रुपांतर न झाल्याने व्यपगत झाला. या प्रकरणी ॲड.जनरल यांचे मार्गदर्शन घेण्यात आले. सदर प्रकरण मा.उच्च न्यायालयात अंतीम निर्णयासाठी प्रलंबित आहे. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय झाल्यावर पुढील आवश्यक ती कार्यवाही करणे योग्य होईल.

-----------------

## वक्फ बोर्डाच्या निलंबित मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी घेतलेले निर्णय रद्द करण्याबाबत

**(२१) * १५०३५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ५४७६ ला दिनांक ३१ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वक्फ बोर्डाचे निलंबित मुख्य कार्यकारी अधिकारी श्री एन.डी.पठाण यांनी त्यांच्या कार्यकाळात घेतलेल्या निर्णयांची श्री.कृष्णा भेगे यांच्या समितीने चौकशी करून त्यात गैरप्रकार झाला असल्याबाबतची माहिती मा.अल्पसंख्याक मंत्री यांनी विधान परिषद सभागृहात माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोषी पठाण यांच्यावर फौजदारी गुन्हे तसेच त्यांनी घेतलेले सर्व निर्णय रदद करून अनियमितता झालेल्या मालमत्ता वक्फ बोर्डाच्या ताब्यात देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर मालमत्ता वक्फ बोर्डाच्या ताब्यात किती मुदतीत देण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी विहित मुदतीत कार्यवाही न करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय,

(२) व (३) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.एन.डी.पठाण यांनी त्यांच्या कार्यकाळात घेतलेल्या निर्णयांची चौकशी करण्यासाठी नियुक्त केलेल्या श्री.के.बी.भोगे, चौकशी समितीने केलेल्या शिफारशीं शासनाने स्वीकारल्या असून सदर शिफारशीच्या अनुषंगाने वक्फ अधिनियम, १९९५ मधील संबंधित तरतूदीनुसार कार्यवाही करण्याबाबत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास कळविण्यात आले आहे. तसे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. एन.डी.पठाण यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्याबाबत ग्रामविकास विभागास कळविण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयातील कोतवालांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(२२) * १४७६० श्री.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयात तलाठ्यांना सहाय्य करण्यासाठी नेमण्यात येणारी कोतवालांची तब्बल १०४६ पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोतवालांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) पुणे जिल्हयात एकूण १४ तालुके असून त्यामध्ये एकुण ५८८ साझे आहेत. पुर्वी सदर सजास एकुण १५८६ कोतवालांची पदे मंजूर होती. परंतू शासनाच्या दिनांक ०९/०९/२००८ च्या निर्णयानुसार एका साझास एक कोतवाल या धोरणानुसार प्रमाणे ५८८ पदांपैकी ५४४ कोतवालांची पदे भरण्यात आलेली आहेत. कोतवालांची रिक्त असलेली एकूण ४४ पदे भरणेची कार्यवाही सुरु असून, काही तालुक्यात भरती प्रक्रीया पुर्ण झाली आहे. तथापि, विशिष्ट प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध न झाल्याने काही कोतवालांची पदे रिक्त आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**खेड (जि.रत्नागिरी) येथे महावितरणाच्या विद्युत खांबावर शॉर्टसर्कीट झाल्यामुळे काजू, आंबा व फणस या फळांची शेकडो कलमे जळून नष्ट झाल्याबाबत**

**(२३) * १५४६७ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) येथे महावितरणाच्या विद्युत खांबावर शॉर्टसर्कीट झाल्यामुळे आंबवली व तिळाचा मळा येथील काजू, आंबा व फणस या फळांच्या कलमांना आग लागून शेकडो कलमे नष्ट झाल्याची घटना दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त बागायतदारांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

सदर अपघाताची चौकशी विद्युत निरीक्षक, विद्युत निरीक्षण विभाग रत्नागिरी यांनी दिनांक १८/०१/२०१६ रोजी केली असून त्याबाबतच्या अहवालानुसार सदर ठिकाणी लागलेली आग विद्युत कारणाने लागली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) सदर अपघात विद्युत कारणाने झाला नसल्याने नुकसान भरपाई देण्याबाबत कार्यवाही करण्यात आली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानकास पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२४) * १५१०७ श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एस.टी.) ची तीनही बसस्थानके पुणे शहराच्या मध्यवर्ती भागात असल्याने या बसेसमुळे शहरात मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही वाहतूक कोंडी टाळण्यासाठी लांबपल्ल्याच्या काही बसेस शहराच्या मध्यवर्ती भागात न येता त्यांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत परिवहन (एसटी) विभागाने शासनाकडे तसेच महापालिकेकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोकणातील मुरुड, जंजिरा व श्रीवर्धन येथील मच्छिमारांना आर्थिक मदत करण्याबाबत

**(२५) * १५३५० श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील मुरुड, जंजिरा व श्रीवर्धनच्या समुद्रात (जेली फिश) ने आक्रमण केल्याने माहे ऑक्टोबर, २०१५ पासून मासेमारी ठप्प झाल्याने येथील मच्छिमारांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने येथील मच्छिमारांना आर्थिक मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे. काही प्रमाणात जेलीफिश आढळून आले आहेत. मात्र मासेमारी ठप्प झाल्याचे निदर्शनास आले नाही.
(३) अशा प्रकारे जेलीफीशमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याबाबतची कोणतीही योजना या विभागामार्फत राबवली जात नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्रातील २४ हजार ३०६ गावे दुष्काळी मदतीतून वगळण्यात आल्याबाबत**

**(२६) * १५९३३ श्री.राजेंद्र जैन, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांना टाळून महाराष्ट्रातील २४ हजार ३०६ गावे दुष्काळाच्या मदतीतून वगळल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावे वगळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर गावांचा पुन्हा सर्व्हे करून त्या गावांचा दुष्काळी गावांच्या यादीत समावेश करुन दुष्काळाबाबत मदत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) राज्यातील खरीप हंगामातील हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या १५७४७ गावांमध्ये दुष्काळ सद्श्य परिस्थिती जाहीर केली आहे. परंतू दुष्काळ जाहीर करण्यास पात्र नसलेल्या परंतु पीक नुकसान झालेल्या औरंगाबाद, नाशिक, अमरावती व नागपूर विभागातील कापूस, अमरावती व नागपूर विभागातील सोयाबिन व नागपूर विभागातील धान पिकाच्या नुकसानी संदर्भात दिनांक २/३/२०१६ च्या आदेशान्वये विशेष मदत जाहीर केलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या कृषीपंपाना वीज जोडणी देण्याबाबत**

**(२७) * १६१०१ श्री.बंटी पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यामध्ये नदी व विहीरी यांच्या माध्यमातून मुबलक पाणी उपलब्ध असतानाही येथील ७ हजार ८६४ शेतकरी गेल्या चार वर्षापासून कृषीपंपाला वीज जोडणीच्या प्रतिक्षेत आहेत, त्यामुळे मुबलक पाणी असून देखील केवळ वीज जोडणी अभावी पिकांना आवश्यक त्यावेळी पाणी देणे शक्य होत नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार येथील कृषी पिकांना वीज जोडणी देणाऱ्या ठेकेदारांकडून जलदगतीने वीज जोडणी द्यावी यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

जानेवारी, २०१६ अखेर कोल्हापूर जिल्ह्यामधील एकूण ८,०२९ इतके शेती पंपासाठीचे अर्ज पैसे भरुन प्रलंबित आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) एकूण ८,०२९ पैकी सर्वाधिक अर्जदारांचा समावेश असलेल्या ३ विभागांच्या कामासाठी नेमलेल्या मे.प्रतिभा व प्रतिक असोसिएटस या कंत्राटदाराच्या कामाचा वेग अतिशय संथ असल्याने सदर कंत्राटदाराचे कंत्राट महावितरण कंपनीकडून अंशत: रद्द करण्यात आलेले आहे व नवीन निविदा प्रसारित करण्यात येवून उपविभागनिहाय नवीन कंत्राटे देण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

------------------

**आर्णी (जि.यवतमाळ) येथील शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी वीज जोडणी देण्याबाबत**

**(२८) * १५६८९ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.रामराव वडकुते, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी (जि.यवतमाळ) येथील ३० शेतकऱ्यांनी विद्युत जोडणीसाठी माहे डिसेंबर, २०१५ अखेर आवश्यक असणारे शुल्क भरुन त्यांना विद्युत जोडण्या देण्यात आल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी वीज जोडण्या देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशत: खरे आहे. यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी उप विभागामध्ये डिसेंबर, २०१५ अखेर पर्यंत ६७१ अर्जदार कृषी पंपाच्या नविन विद्युत जोडणीसाठी आवश्यक शुल्काचा भरणा करुन महावितरण कंपनीकडे प्रलंबित आहेत. त्यापैकी आर्णी गावातील १२ ग्राहक असून आर्णी तालुक्यातील ६६३ ग्राहक आहेत.

(२) सदर शेतकऱ्यांना कृषीपंप वीज जोडण्या देण्याचे काम इन्फ्रा-२, धडक सिंचन योजना, विशेष पॅकेज, जिल्हा नियोजन मधील विशेष घटक योजना, आदिवासी उपयोजना व बिगर आदिवासी योजनेमार्फत सुरु आहेत. एप्रिल, २०१५ ते डिसेंबर, २०१५ पर्यंत आर्णी तालुक्यात एकूण ३६० कृषीपंपाना वीजजोडण्या देण्यात आल्या असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वहाळ (ता.पनवेल, जि.रायगड) येथील ग्रामस्थांनी दारूबंदीसाठी केलेल्या मोर्चाबाबत**

**(२९) * १४९१९ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वहाळ (ता.पनवेल, जि.रायगड) येथील ग्रामसभेत दारूबंदीबाबत दिनांक २६ जानेवारी २०१५ रोजी वा त्यासुमारास निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामसभेचा विरोध असतांनाही शासनाने शेट्टी नावाच्या परवानाधारकास बार सुरु करण्यास संमती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शाळेच्या आवारापासून फक्त १०० फुटांवर हे बार सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यार्थी, महिला व ग्रामस्थ यांनी बारला विरोध करण्यासाठी मंगळवार, दिनांक २२ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मोर्चा काढला होता, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मोर्चाच्यावेळी ए.पी.आय. शेखर बागडे यांनी मोर्चेक-यांना उर्मट व उद्धट भाषा सुनावून दमदाटी केली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(७) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) सदरचा ठराव ग्रामपंचायत वहाळ यांनी त्यांचे पत्र दिनांक १४/१२/२०१५ रोजी मा.जिल्हाधिकारी रायगड यांना दिला. सदर ठरावाची प्रत जिल्हाधिकारी यांच्यामार्फत राज्य उत्पादन शुल्क यांच्या कार्यालयास दिनांक १/१/२०१६ रोजी प्राप्त झाला.

(२) जिल्हा निवड समीच्या बैठकीमध्ये दिनांक २७/१०/२०१५ रोजी मंजूरी मिळाल्यानुसानर सदर परवाना कक्ष मंजूर करण्यात आला.

(३) सदर अनुज्ञप्तीची जागा ही अंतरनिर्बंध मुक्त आहे.

(४) हे खरे आहे.

सेक्टर १९ उलवा येथील चौकात ग्रामस्थ, विद्यार्थी, महिला यांच्यामार्फत निषेध सभा आयोजित करण्यात आली होती.

(५) हे खरे नाही.

(६), (७) व (८) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील पाच लाख शेतकऱ्यांना सोलर पंप देण्याबाबत**

**(३०) * १५९४३ श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पाच लाख शेतकऱ्यांना सोलर पंप देण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे अंशतः खरे आहे. राज्यातील शेतकऱ्यांना ७५४० सोलर पंप देण्याचा निर्णय शासनाने माहे मार्च, २०१५ मध्ये घेतला आहे.

(२) राज्यात सौरकृषी पंप बसविण्याच्या पथदर्शी प्रकल्पाची अंमलबजावणी महाऊर्जा व महावितरण कंपनीमार्फत करण्यात येत असून त्याकरिता १०० % टर्न-की पद्धतीने कंत्राटदाराची नेमणूक केली आहे.

सदर पथदर्शी प्रकल्पासाठी महावितरण कंपनीने राष्ट्रीय स्तरावर १४ ई-निविदा काढल्या असून निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यानुसार पात्र ठरलेल्या सर्वात कमी प्राप्त दर असलेल्या कंपन्यांना माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये निविदा बहाल (LOA) करण्यात आलेल्या असून लाभार्थी निवडीचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**"छत्रपती शिवाजी टर्मिनस" या रेल्वे स्टेशनचे व छत्रपती शिवाजी विमानतळ" या विमानतळाचे नाव बदलण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(३१) * १५४०० ॲड.अनिल परब :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मध्य रेल्वेच्या "छत्रपती शिवाजी टर्मिनस" या रेल्वे स्टेशनचे आणि" छत्रपती शिवाजी विमानतळ" या विमानतळाचे नाव अनुक्रमे "छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस" आणि "छत्रपती शिवाजी महाराज विमानतळ" करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाने केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर केव्हा निर्णय घेण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## राज्यात वापरात नसलेली शासकीय जमीन विकून ५ हजार कोटी रुपये उभारण्याचा शासनाचा प्रस्तावाबाबत

**(३२) * १४८०३ श्री.माणिकराव ठाकरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सध्या वापरात नसलेली शासकीय जमीन विकून ५ हजार कोटी रुपये उभारण्याचा शासनाचा प्रस्ताव असल्याचे माहे आक्टोबर २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेवून विविध ट्रस्टला, नागरिकांना भाडेतत्वावर दिलेल्या जमिनी पुन्हा ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) विविध व्यक्ती, संस्था, ट्रस्ट इ. यांना विविध प्रयोजनांकरिता प्रदान/भाडेपट्टयाने मंजूर केलेल्या शासकीय जमिनीचा, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतूदी व महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे विल्हेवाट लावणे) नियम, १९७१ नुसार विहीत कालावधी वापर करणे बंधनकारक आहे. एखाद्या प्रकरणामध्ये सदर अटीचा भंग झालेला आढळून आल्यास अशा ठिकाणी प्रकरणपरत्वे उक्त अधिनियम व नियमातील तरतूदीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येते.

विविध व्यक्ती/संस्था यांना निरनिराळ्या प्रयोजनांकरिता कब्जाहक्काने किंवा भाडेपट्टयाने मंजूर केलेल्या मात्र विहित कालावधीत वापरात न आणलेल्या जमिनी सरसकट संबंधितांकडून परत घेवून त्यांची विक्री करुन निधी उभारण्याचा कोणताही सर्वसाधारण धोरणात्मक निर्णय शासनाने घेतलेला नाही.

-----------------

**सोलापूर आणि अहमदनगर हे दोन्ही जिल्हे दुष्काळी जिल्हे म्हणून घोषित करण्याबाबत**

**(३३) * १५५८० श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर आणि अहमदनगर जिल्ह्यात दुष्काळ जाहीर केल्याची घोषणा शासनाने दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घोषणेनुसार सदर दोन्ही जिल्ह्यातील दुष्काळ निवारणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) राज्यात सन २०१५ च्या खरीप हंगामातील हंगामी पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी आलेल्या १५७४७ गावामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. दुष्काळ निवारण्याबाबत शासनाने दिनांक २०/१०/२०१५ च्या शासन निर्णयान्वये विविध सवलती जाहीर केलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचा निधी कपात केल्याबाबत**

**(३४) * १६०४८ श्री.महादेव जानकर, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शासनाने नागपूर अधिवेशनात १७ हजार कोटीच्या पुरवणी मागण्या सादर केल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुरवणी मागण्यातील दुष्काळग्रस्तांच्या निधीत शासनाने ५० टक्के कपात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या निधीत कपात करण्याची कारणे काय आहे,

(४) असल्यास, सदर निधी पुर्ववत ठेवुन दुष्काळग्रस्तांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) या विभागाकडून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी रु.४००२.८२ कोटी इतक्या रक्कमेची पुरवणी मागणी सादर करण्यात आली होती.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील वाळू लिलावास पर्यावरण खात्याची परवानगी नसतानाही वाळू लिलाव केल्याबाबत

**(३५) * १५१५५ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील विविध ठिकाणी वाळू लिलाव प्रक्रिया पूर्ण झाली असून या लिलावाकरीता पर्यावरण खात्याची परवानगी घेण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगाव जिल्ह्यात १६ वाळू गटातून उत्खनन सुरु असून पर्यावरण खात्याची परवानगी नसताना सदर लिलाव झाले असून सुमारे रूपये १५ कोटी महसूल जमा झाला आहे व अजून २७ वाळूगटांची लिलाव प्रक्रिया पर्यावरण खात्याच्या परवानगी शिवाय सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) जळगाव जिल्हयात सन २०१५-१६ या वर्षासाठी एकूण ४४ वाळूगटांना पर्यावरण अनुमती प्राप्त झाली आहे. पर्यावरण अनुमतीच्या अधिन राहून सर्व वाळू गटांचे लिलाव डिसेंबर २०१५ मध्ये आयोजित करण्यात आले होते. लिलावामध्ये १८ वाळूगट गेले असून, त्यापासून

सुमारे रु. १६.९२ कोटी एवढा महसूल प्राप्त झाला आहे. सदर वाळूगटातून उत्खनन करण्यासाठी जानेवारी २०१६ मध्ये पर्यावरण अनुमती प्राप्त झाल्यानंतर लिलावाची संपूर्ण रक्कम शासन जमा केलेल्या लिलावधारकांना संबंधित वाळूगटांचे ताबे देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील कापूस व फळबाग क्षेत्राला अनुदान देण्याबाबत**

**(३६) * १५५३६ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुका १०० टक्के दुष्काळग्रस्त असुन दुष्काळावर मात करण्यासाठी शासनाने औरंगाबाद जिल्ह्याला रूपये १०७.२८ कोटी रुपये अर्थसहाय वितरीत केल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने कापूस व फळबाग क्षेत्राला अनुदान न देता सोयाबीन पिकाला प्राधान्य दिलेले आहे मात्र वैजापूर तालुक्यात सोयाबीनचे क्षेत्र शून्य आहे तसेच या तालुक्यातील १०० पेक्षा जास्त प्रस्ताव अजून मंजूरीसाठी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हवेली तालुक्यातील (जि.पुणे) पूर्व भागातील शेतकऱ्यांना ठिबक सिंचन अनुदानाचे वाटप करण्याबाबत

**(३७) * १५३८७ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली तालुक्यातील (जि.पुणे) पूर्व भागात गेल्यावर्षी सुमारे ३५० तर यावर्षी ३०० शेतकऱ्यांकडून ठिबक सिंचन अनुदानासाठीचे प्रस्ताव शासनाकडे आले आहेत. शासनाकडून कृषी विभागाला सुमारे सव्वा कोटीचे अनुदान वर्ग झालेले आहे मात्र काही मोजक्या शेतकऱ्यांना अनुदान मिळाले असून इतर शेतकऱ्यांचे प्रस्ताव प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शेतकऱ्यांना सदर अनुदानाचे वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यामध्ये सन २०१४-१५ या वर्षात २३३ अर्ज प्राप्त झाले होते. सदर तालुक्यासाठी केंद्र व राज्य हिस्सा मिळून रु. ३७.५८ लाख एवढा निधी मंजूर करण्यात आला होता. सदर निधीच्या मर्यादेत प्राथम्यक्रमानुसार १६८ अर्जांना मंजूरी देण्यात आली. सदर १६८ शेतकऱ्यांच्या अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करुन प्रस्ताव निकाली काढण्यात आले आहेत. पूर्व संमती न दिलेले प्रस्ताव प्रलंबित आहेत असे म्हणता येत नाही.

सन २०१५-१६ या वर्षात सदर तालुक्यात २९७ अर्ज ऑनलाईन नोंदणी झालेले आहेत. केंद्र शासनाकडून पहिल्या हप्त्यापोटी प्राप्त झालेला निधी व त्याप्रमाणात राज्य हिश्श्याचा निधी असा एकूण रु. ४८.२६ लाख निधी उपलबध करुन देण्यात आला आहे. सदर निधीच्या मर्यादेत १६१ प्रस्तावांना पूर्वसंमती देण्यात आली आहे. अनुदान वितरणाची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळण्याबाबत

**(३८) * १५४०७ श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील करमाळा व उस्मानाबाद जिल्ह्यातील परंडा तालुक्याच्या सीमेवर मधोमध सीनी नदी वाहत आहे, परंतु गेल्या पाच वर्षापासून अल्प पावसामुळे सीना नदी कोरडी असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सीनी नदीच्या पलिकडे शासनाने दुष्काळ जाहीर केला पण नदीच्या अलिकडे दुष्काळ जाहिर केला नसल्यामुळे प्रशासनाच्या या दुजाभावामुळे येथील शेतकरी वर्ग संतप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार नदीच्या दोन्ही काठावरील शेतकऱ्यांना न्याय मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) उस्मानाबाद सन २०१५ मधील सर्व ७३७ गावांची पैसेवारी ही ५० पैशापेक्षा कमी असल्याने दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर केली आहे. सोलापूर जिल्हा रब्बी पिकाची अंतिम पैसेवारी अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महावितरण द्वारा चोरी होत असलेल्या विजेचा भुर्दंड**
**सामान्य ग्राहकांना भरावा लागत असल्याबाबत**

**(३९) * १५२०४ श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण द्वारा चोरी होत असलेल्या विजेच्या देयकाची भरपाई करीता सामान्य ग्राहकांना वीज देयकामध्ये वीज शुल्क शिर्षांतर्गत शुल्क/पैसे भरावे लागत असल्याची बाब दिनांक २ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामान्य वीज ग्राहक आपले वीज देयक वेळेवर भरत असताना देखील हे वीज शुल्क त्यांना भुर्दंड व जादाचे भरावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरणने वीज चोरी रोखण्याकरीता केलेल्या उपाययोजना अपुऱ्या पडल्यामुळेच हा भुर्दंड सामान्यांना भरावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सामान्य ग्राहकांच्या वीज देयकामध्ये वीज शुल्क शिर्षांतर्गत भरावे लागणारे शुल्क कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

तथापि, वीज चोरी रोखण्याकरिता महावितरण कंपनीतर्फे करण्यात येणाऱ्या उपाययोजना पुढील प्रमाणे आहेत :-

१) राज्यात आज रोजी एकूण कायम स्वरुपी ४४ फिरते पथक आपआपल्या कार्यक्षेत्रात नियमीतपणे विद्युत संचाची तपासणी करुन विद्युत संचातील अनियमितता व वीज चोरीचे प्रकार शोधून काढण्यासाठी कार्यरत आहेत.

२) राज्यात याशिवाय विभागीय पातळीवर एकूण १२० विशेष पथके स्थापन करण्यात आलेली आहेत.

३) वीज चोरीची प्रकरणे उघडकीस आणण्याकरिता फिरत्या पथकांमार्फत खास तपासणी मोहिम राबविण्यात येतात.

४) प्रविभागीय/विभागीय /उपविभागीय पातळीवर एनर्जी ऑडीट करण्यात येते. निर्धारित नॉर्मल लॉसेस पेक्षा जास्त लॉस असल्याचे आढळून आल्यास संबंधित विभागातील ग्राहकांची कसून तपासणी करण्यात येते.

५) ग्राहकांच्या मिटर बॉक्स व मिटर टर्मिनलला सुरक्षा मोहर लावले जातात ज्यामुळे ग्राहकांस त्यांचे मिटर बॉक्स उघडता येत नाही. तसेच ग्राहकांच्या मिटरला ज्या सी.टी.द्वारे द्वितीय बाजूस वीज पुरवठा दिला जातो त्या सर्व भागास वेल्ड केले जाते.

६) वीज ग्राहकास आधुनिक प्रकारची इलेक्ट्रॉनिक मिटर्स उच्चदाव व लघुदाब औद्योगिक ग्राहकास वापरण्यात येत असून, ह्या मिटरमध्ये ४५ ते ६० दिवसाची मागील संपुर्ण माहिती व वीज वापर अथवा ग्राहकाने लबाडीच्या उद्देशाने काही फेरफार केला असल्यास त्याची नोंद होते. त्याचप्रमाणे त्या ग्राहकास बिले देता येतात अथवा पुरवणी बिल मागता येते.

७) उच्चदाब ग्राहक सी.टी.पी.टी. पासून मिटरपर्यंत जाणाऱ्या चिलखती वीज तारेत छिद्र पाडून मिटरला जाणाऱ्या वीज प्रवाहात खंड पाडू शकतो किंवा इलेक्ट्रॉनिक स्वीच टाकू शकतो, त्याला तसे करता येऊ नये म्हणून किऑस्क पद्धतीचा मिटर्स सिस्टीमचा वापर सुरू आहे.

८) वीज चोरीस आळा घालून, त्यावर कायदेशीर कारवाई त्वरीत होण्यासाठी विशेष न्यायालये स्थापन करण्याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी त्यांचे आदेश क्र. ए-१२१८७/२००५ दिनांक ८.१२.२००५ अन्वये मुंबई व्यतिरिक्त सर्व जिल्हा मुख्यालयाचे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाचे मा.न्यायाधीश यांना विद्युत अधिनियम, २००३ च्या केसेस चालविण्यासाठी विशेष न्यायालय म्हणून पदनिर्देशित केलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक जिल्ह्यातील मालेगांवच्या अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी**
**३५ लाखाची लाच मागितल्याबाबत**

**(४०) * १५२९३ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील मालेगांवच्या अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी ३५ लाखाची लाच मागितल्याने त्यांना अटक करण्यात आले होते परंतू जामिनावर सुटताच लाचलुचपत प्रतिबंधित खात्याकडे तक्रार करणाऱ्या जमीन मालकांविरुध्द फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करण्यासाठी नांदगाव तहसिलदारांना दबाव टाकण्यास सुरुवात केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) श्री. रामचंद्र बापुराव पवार, तत्का. अप्पर जिल्हाधिकारी मालेगांव, जि. नाशिक यांना लाच लुचपत प्रकरणी दिनांक ०६.०८.२०१५ रोजी अटक करण्यात आली होती. श्री. पवार यांची जामीनावर सुटका झाल्यानंतर त्यांनी संबंधित जमीन मालकांविरुध्द फौजदारी खटले दाखल करण्याबाबत तहसीलदार नांदगाव यांना दिनांक १०.०८.२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. तथापि तहसीलदार नांदगाव यांनी संबधितांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल केले नाहीत. श्री. रामचंद्र बापुराव पवार, तत्का. अप्पर जिल्हाधिकारी मालेगाव, जि. नाशिक यांना शासन आदेश दिनांक २१.११.२०१५ अन्वये अटकेच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक ०६.०८.२०१५ पासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यात नैसर्गिक आपत्तीमुळे रब्बी पिकांचे हंगाम धोक्यात आल्याबाबत

**(४१) * १४६१४ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात नैसर्गिक आपत्तीमुळे रब्बी पिकांचे संपूर्ण हंगाम धोक्यात आले असून जिल्ह्यातील दीड लाख हेक्टर वरील पीक धोक्यात आल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यात १ लाख ४२ हजार हेक्टरवर रब्बी पिकांची पेरणी करण्यात आली असून यामध्ये सर्वाधिक क्षेत्र हरभरा पिकाचे आहे. ढगाळ वातावरणाने हरभरा पिकांवर घाटे अळीचे आक्रमण झाले असून हरभऱ्याचा बार जळाला असल्यामुळे उत्पादनात घट झाले आहे तसेच रब्बी हंगामातील तीळ, मोहरी, करडी, ज्वारी, गहू, मका या पिकांच्या उत्पादनात देखील घट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) यवतमाळ जिल्ह्यात सन २०१५-१६ च्या रब्बी हंगामात एकूण १,४२,०६१ हेक्टर क्षेत्रावर पेरणी करण्यात आलेली आहे. त्यामध्ये हरभरा पिकाचे क्षेत्र ८०,६७७ हेक्टर इतके आहे. जिल्ह्यात घाटे अळीचा प्रादुर्भाव नुकसान पातळीच्या आत आढळून आलेला आहे. याबाबत क्रॉपसॅप अंतर्गत क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी यांचेमार्फत शेतकऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करुन घाटेअळीच्या नियंत्रणाबाबत माहिती देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्ह्यात फळपीक विमा योजना लागू करण्याबाबत

**(४२) * १५५२० श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात आंबा व बागांना वारंवार आगी लागण्याच्या घटना घडत असून आंबा पिकास विमा संरक्षण नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंबा पिकाला संरक्षण पुरविण्यासाठी विमा योजना लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात फळबागांना आगी लागण्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत. राज्यात हवामान आधारीत फळपिक विमा योजना दिनांक ३ डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आली असून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबा या फळपिकाचा सदर योजनेत समावेश आहे. ही योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनूसार राबविण्यात येत असून सदर योजनेंतर्गत पाऊस, सापेक्ष आर्द्रता, वेगाचे वारे व गारपीट या हवामान धोक्यापासून संरक्षण देण्यात येते.

(२) केंद्र शासनाच्या SDRF निकषात आग ही आपत्ती म्हणून समाविष्ट असून नैसर्गिक आगीमुळे शेती/फळपिकांचे नुकसान झाल्यास त्या करिता बाधितांना नुकसान भरपाई देणे/मदत देण्याची कार्यवाही महसूल व वन विभागाच्या दिनांक ३० जानेवारी, २०१४ व दिनांक १३ मे, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील उंबरशेत येथील आशापुरा माईनकेम कंपनीने विनापरवाना गौणखनिजाचा साठा केल्याबाबत

**(४३) * १५३७७ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील उंबरशेत येथील आशापुरा माईनकेम कंपनीने औद्योगिक बिनशेती जागेचा अनधिकृत वापर करीत विनापरवाना गौणखनिजाचा बॉक्साईट साठा केल्या प्रकरणी दापोली तहसीलदारांनी ६० हजार रुपयांचा दंड ठोठावला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर कंपनीकडून दंड वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) होय. मौजे उंबरशेत, ता.दापोली येथे मे.आशापुरा माईनकेम लि. या कंपनीच्या अनधिकृत औद्योगिक बिनशेती वापराबाबत तहसिलदार, दापोली यांनी सदर कंपनीकडून रु. ६०,०००/- इतकी दंडात्मक रक्कम वसूल केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाटण (जि.सातारा) तालुक्यातील कोयना प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसन आणि नागरी समस्यांबाबत

**(४४) * १५७७२ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटणा तालुक्यातील (जि.सातारा) कोयना प्रकल्पग्रस्तांचे सन १९६७ मध्ये पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यात कुसवडे तुसे या ठिकाणी पुनर्वसन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या ४५ वर्षापासून येथील रहिवाशांना आर्थिक सहाय्य तसेच नागरी सुविधाही न मिळाल्याने दिनांक ११ जानेवारी, २०१६ पासून तेथील रहिवाशी उपोषणास बसले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्पाच्या अनुषंगाने प्रकल्प ग्रस्तांना शासनाने नोकरी देण्याचे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासकीय सेवेत सामावून न घेतलेल्या व प्रतिक्षा यादीवर असलेल्या प्रकल्पग्रस्तांची संख्या किती आहे,

(५) असल्यास, प्रकल्प ग्रस्तांना शासकीय सेवेत सामावून घेणे शक्य नसल्यास संबंधीत प्रकल्प ग्रस्तांना प्रत्येकी २० लाख रूपये भरपाई मिळावी अशी मागणी कोयना प्रकल्पग्रस्त समितीचे सचिवांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(७) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर रहिवाशांना आर्थिक सहाय्य, शासकीय नोकरी तसेच नागरी सुविधा मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

कोयना प्रकल्पग्रस्तांनी मौजे कुसवडे (तुसे) येथे स्वत:चे पुनर्वसन करुन घेतले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

मौजे कुसवडे (तुसे) येथील रहिवाश्यांनी दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी एक दिवसांचे उपोषण केले होते.

(३) हे खरे नाही.

(४) मूळ ठाणे व नवनिर्मित पालघर जिल्ह्यातून ६०० पेक्षा जास्त प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात आली आहेत. तसेच सद्य:स्थितीत प्रकल्पग्रस्तांची प्रतीक्षा यादी ठेवण्यात येत नाही.

(५) हे खरे आहे.

(६) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २७.१०.२००९ च्या शासन निर्णयानुसार प्रकल्पग्रस्तांच्या नेमणूका त्यांची सेवाप्रवेश अर्हता तपासून, सेवाप्रवेश नियमानुसार जाहिराती देऊन स्पर्धा परीक्षेद्वारे व गुणवत्तेनुसार करण्यात येतात.

(७) नोकरीबाबत उपरोक्त ६ नुसार कार्यवाही करण्यात येत आहे. प्रकल्पग्रस्तांना पायाभूत नागरी सुविधा देण्यात आल्या असून, उर्वरित नागरी सुविधा देण्यासाठीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(८) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**खामगाव (जि.बुलडाणा) येथील शेतकऱ्यांच्या कृषी पंपाना कनेक्शन देणेबाबत**

**(४५) * १६६२१ श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमांक १२५७० ला दिनांक ११ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगाव (जि.बुलडाणा) तालुक्यातील शेतकऱ्यांनी मागील दोन वर्षापासून नवीन कृषी पंपाचे कनेक्शन मिळण्याबाबत अर्ज व पैसे भरुनसुद्धा महाराष्ट्र वीज वितरण कंपनी मर्या. खामगाव यांनी नवीन जोडण्या दिल्या नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार शेतकऱ्यांना कृषी पंपाना वीज जोडणी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशत: खरे आहे. महावितरणाच्या खामगाव विभागांतर्गत पैशाचा भरणा करून प्रलंबित असलेल्या कृषीपंपाना सन २०१२-१३ मध्ये २३१३, सन २०१३-१४ मध्ये २३५७, सन २०१४-१५ मध्ये १३९४ व सन २०१५-१६ मध्ये (फेब्रुवारी, २०१६) अखेरपर्यंत २२५४ अश्या एकूण ८३१८ विद्‌युत जोडण्यात दिल्या आहेत.
(२) होय.
(३) शेतकऱ्यांना कृषी पंप वीज जोडणी तात्काळ उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने विदर्भ व मराठवाडा विशेष कृषीपंप पॅकेज अंतर्गत खामगाव विभागासाठी एकूण २४.५० कोटी रक्कमेचा निधी उपलब्ध झालेला असून त्यामध्ये मार्च, २०१५ पर्यंत प्रलंबित असणाऱ्या सर्व कृषीपंप धारकांना वीज जोडणी देणे प्रस्तावित आहे. याबाबतची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन विविध कंत्राटदारामार्फत कृषी पंप कनेक्शन तात्काळ उपलब्ध करुन देण्याची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच इन्फ्रा-२ योजनेंतर्गत सुध्दा कृषीपंप उर्जीकरणाची कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हयातील खाजण जमिनी विविध सहकारी संस्थांनी मिठागरांसाठी भाडेपट्टा नुतनीकरणासाठी देण्यात न आल्याबाबत

**(४६) * १६७०४ श्री.गुरुमुख जगवानी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील खाजण जमिनी विविध सहकारी संस्थांनी मिठागरांसाठी भाडेपट्टा नुतनीकरणासाठी विहित मुदतीत अर्ज करुनही देण्यात न आल्याने विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी जिल्हाधिकारी, पालघर यांना शासनास खुलासा सादर करण्याचे आदेश देण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मीठ उत्पादक सहकारी संस्थांनी शासनाकडे वारंवार मुदतीत लीज वाढवून मिळण्यासाठी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) पालघर-डहाणू तालुका मीठ उत्पादक असोसिएशन यांनी दिनांक ४/११/२०१५ रोजी मा.राज्यमंत्री (महसूल) यांना अशा स्वरुपाचे निवेदन दिले होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाच्या प्रचलित धोरणानुसार उचित कार्यवाही करण्याबाबत दिनांक ५/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, पालघर यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. मात्र या संस्थांनी भाडेपट्टयास मुदतवाढ देण्यासाठी जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडे अर्ज केल्याचे आढळून येत नाहीत.

पालघर व डहाणू तालुक्यातील एकूण २४ सहकारी संस्थांना मिठागरासाठी भाडेपट्टयाने दिलेल्या खाजण जमिनीपैकी २१ संस्थांकडून शर्तभंग झाल्याने/मुदत संपल्याने जमिनी शासन जमा करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कोतवालांना चतुर्थ श्रेणी लागू करण्याबाबत**

**(४७) * १६७३२ श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कोतवालांना चतुर्थ श्रेणी देण्याची मागणी बऱ्याच वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोतवाल संघटनेने शासनाकडे उपोषण, मोर्चे, धरणे आंदोलन इत्यादी प्रकारे अनेकदा आंदोलने केली जात आहेत व त्यांना मा.महसूल मंत्री महोदयांकडून फक्त आश्वासनच मिळत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार गाव पातळीवर काम करणाऱ्या कोतवालांना चतुर्थ श्रेणी लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) राज्यातील कोतवालांची प्रमुख मागणी चतुर्थश्रेणी दर्जा देण्याबाबत आहे. त्यानुषंगाने कोतवालांच्या विविध संघटनांकडून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

कोतवालांना चतुर्थश्रेणी दर्जा मिळावा या संबंधीच्या मागणी संबंधित विभागांचे अभिप्राय घेवून उचित निर्णयाची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील दुग्ध व्यवसाय व शेतकऱ्यांना आर्थिक मदतीचे पॅकेज देण्याबाबत**

**(४८) * १७०७१ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद : तारांकित प्रश्न क्रमांक ७९१२ ला दिनांक १६ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दुष्काळी परिस्थिती, दूधाचे कमी झालेले भाव, चाऱ्याचा प्रश्न, पशुखाद्याचे वाढलेले भाव, यामुळे राज्यात दुग्ध व्यवसाय धोक्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार राज्यातील दुग्ध व्यवसायाला मदत करण्याबाबत तसेच, शेतकऱ्यांना आर्थिक मदतीचे पॅकेज देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) गेल्या वर्षी माहे ऑगस्टपर्यंत पाऊस उशीरा व पुरेशा प्रमाणात न झाल्याने राज्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती उद्‌भवल्यामुळे पिण्याचे पाणी तसेच जनावरांच्या चाऱ्याच्या उपलब्धतेत कमतरता आली होती. याशिवाय सन २०१५ मध्ये आंतरराष्ट्रीय बाजारातील दूध भुकटीच्या दरात मोठ्या प्रमाणात झालेल्या घसरणीमुळे खाजगी प्रकल्पांनी त्यांचे दूध खरेदी दर रु. १६ ते १८ प्र.लि. पर्यंत कमी केले होते, हे खरे आहे.

मात्र शासनाने शासनाचे दूध खरेदी दर रु. २०+ रु. २.५० (वरकड खर्च) असे रु. २२.५० प्र.लि. हे नोव्हेंबर, २०१४ पासून कायम ठेवले असून त्यात आतापर्यंत बदल केलेला नाही. राज्यातील बीड जिल्हा व बीड तालुका सहकारी दूध संघ वगळता इतर सर्व सहकारी संघ शासन दराने दूध खरेदी करीत आहेत.

बीड जिल्हा व बीड तालुका सहकारी दूध संघाविरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७९ अ अन्वये सहनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) यांच्यामार्फत कार्यवाही सुरु आहे.

(२) व (३) दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने खालीलप्रमाणे उपाययोजना केल्या आहेत.

१) डिसेंबर, २०१४ ते ऑगस्ट, २०१५ या कालावधीत शासनाने सहकार क्षेत्रातील अतिरिक्त दूध शासन दराने स्वीकृत केले आहे.

२) शासनाने निश्चित केलेले दूध खरेदीचे दर (वरकड खर्चासह) प्रमाणीत मानून राज्यातील सहकारी संघ/संस्थांनी हाच दर शेतकऱ्यांना देणे आवश्यक असल्याबाबतचे निर्देश महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७९ अ अन्वये शासनाने दिनांक १०.७.२०१५ रोजी निर्गमित केले आहेत.

३) केंद्र शासनाने दूध भुकटी निर्यातीवर बंद केलेले ५% अनुदान पुन्हा सुरु करुन ते १०% करण्याबाबत केंद्र शासनास कळविले आहे.

४) दुधाकरीता किमान आधारभूत किंमत सद्यस्थितीत निश्चित नाही. सदर अधिकार जीवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ नुसार केंद्र शासनास

आहेत. दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताकरीता दुधासाठी किमान आधारभूत किंमत प्राप्त व्हावी या उद्देशाने राज्य शासनाने दिनांक १९.८.२०१५ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास प्रस्ताव पाठवून विनंती केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बाळापूर (जि.अकोला) तालुक्यात सततच्या नापिकीमुळे विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याबाबत

**(४९) * १७६८३ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाळापूर (जि.अकोला) तालुक्यात सततच्या नापिकीमुळे शिक्षणासाठी कुटुंबाकडे पैसे नसल्याने चिंतातूर झालेल्या दधम येथील नववीत शिकत असलेल्या विशाल विश्वनाथ खुळे या विद्यार्थ्याने दिनांक २२ नोव्हेंबर, २०१५ रोजी आत्महत्या केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय,

सदर प्रकरणी चौकशी केली असता सदर कुटुंबाकडे एकूण २.२२ हेक्टर आर शेती असून सदर कुटूंबात आई, वडील, मोठा भाऊ व मृतक विशाल अशा ४ व्यक्तींचा उदर्निवाह सदर शेतीवर अवलंबून असल्याचे दिसून आले तसेच सन २०१४-१५ या वर्षात सदर शेतीमधून अल्प उत्पादन झाल्याचे निदर्शनास आले आहे. परंतु सदर प्रकरण हे आत्महत्येसंदर्भात असलेल्या निकषात बसत नसल्यामुळे मदतीबाबत कार्यवाही करता आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विदर्भात संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(५०) * १७८८१ श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.संदिप बाजोरिया, श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना शासनाकडून कोणतीच मदत झाली नसल्याची बाब माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सन २०१५ मध्ये संत्र्याचे दर १५ रुपये प्रतिकिलोवरुन घसरुन ४ ते ५ रुपये प्रतिकिलो झाल्याने शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, यावर्षी अनियमित पाऊस व थंडीचा परिणाम संत्र्याच्या गुणवत्तेवर झाल्याने संत्र्याचे भाव मोठया प्रमाणात घसरले आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, दरवर्षी बांग्लादेश व भूतानसारख्या देशात निर्यात होणारी संत्री यावर्षी गुणवत्तेचे कारण देऊन नाकारण्यात आल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, यावर्षी मोठया प्रमाणावर संत्रा उत्पादन होऊनसुध्दा विदर्भात संत्र्यावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांचा अभाव असल्यानेच शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे, हे ही खरे आहे काय

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(७) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही. केंद्र शासन पुरस्कृत एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानातंर्गत सन २०१५-१६ मध्ये विदर्भाकरीता २४४९.४७ लाख इतकी तरतूद करण्यात आली आहे.

(२), (३), (४), (५), (६), (७) व (८) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यात विकासकाकडून बेकायदेशीर उत्खनन होत असल्याबाबत

**(५१) * १७९३० श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील साखरे (घारगाव) गावातील सर्व्हे क्र.५२, ५३, ५४, ५८, ४६/१५ मध्ये उषा बन्सल या विकासकाने स्कॉय व्हिला बंगलो प्रोजेक्ट उभारण्यासाठी वर्षभरापूर्वी रस्ता व बांधकाम सुरू केले असून त्यासाठी बेकायदा रेती उत्खनन सुरू केले असताना शासनाचा लाखो रूपयांचा महसूल बुडविल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान करून सुध्दा महसूल विभागाने कोणतीही कारवाई केलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे २ वर्षापासून मुरबाड शहर परिसर, टोकावडे, म्हसा, शिरोशी परिसरासह माळशेज घाटाच्या पायथ्याशी डोंगर फोडून भुईसपाट करून बेकायदेशीर उत्खनन होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बेकायदा उत्खनन करणाऱ्यांना महसूल विभागाकडून संगनमताने पाठीशी घालण्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, साखर (घारगाव) येथे स्कॉय व्हिला बंगलो प्रोजेक्ट सुरू असल्याप्रकरणी व तेथे झालेल्या बेकायदेशीर उत्खनन व रॉयल्टी चोरीच्या जागेवर जावून पंचनामा करून तलाठी श्री.संजय साखरे यांनी महसूल विभागाला अहवालही पाठविलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार बेकायदा होणारे उत्खनन रोखण्याबाबत तसेच अवैध उत्खनन करून शासनाचा महसूल बुडविणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३), (४) (५) व (६) मुरबाड तालुक्यातील मौजे साखरे (धारगांव) गावाच्या हद्दीत “स्काय व्हिला” प्रोजेक्टच्या मालकाने विनापरवानगी उत्खनन केल्याची तक्रार तहसिलदार मुरबाड यांना दिनांक ०७/११/२०१५ रोजी प्राप्त झाली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असता “स्काय व्हिला” प्रकल्पाच्या विकासकाने ६८२ ब्रास दगड व १६० ब्रास मातीचे अनधिकृत उत्खनन केल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार तहसिलदार मुरबाड यांनी सदर प्रकरणी रुपये ७७,३३,८००/- एवढ्या रकमेचे दंडाचे आदेश पारीत केले आहेत.

मुरबाड शहर परिसरातील टोकावडे, म्हसा व इतर घाटाच्या पायथ्याशी डोंगर फोडून भूईसपाट करण्याचे प्रकार निदर्शनास आलेले नाहीत.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यात अवैध वाळू उपसा व वाहतूक थांबविण्याबाबत**

**(५२) * १८०६८ श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यात विनापरवाना वाळू वाहतूक करणाऱ्यांवर महसूल विभागाने केलेल्या कारवाईत चार वाहन धारकांना दीड लाखांचा दंड केला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार अवैध वाळू उपसा व वाहतूक पुर्णपणे थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) चिपळूण तालुक्यात जानेवारी, २०१६ मध्ये वाळूच्या अवैध वाहतूकीबाबत १६ वाहनधारकाकडून रु. ४,८३,२००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

(२) व (३) जिल्हाधिकारी रत्नागिरी यांनी गौण खनिजाचे अवैध उत्खनन/वाहतूक करणाऱ्यांविरुध्द नियमानुसार दंडात्मक कारवाई तसेच फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबतच्या सूचना सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

तसेच अवैध उत्खनन/वाहतूकीच्या प्रकरणात गौण खनिजाच्या बाजारभावाच्या ५ पट दंड आकारणे, उत्खनन व वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली यंत्रसामग्री व वाहने जप्त करणे, प्रकरणपरत्वे वाळू तस्करांविरुध्द एम.पी.डी.ए अधिनियमांतर्गत कारवाई करणे, गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध आणण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस आयुक्त/पोलीस अधिक्षक, प्रादेशिक परिवहन अधिकारी यांची समिती स्थापन करणे इत्यादी उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर जिल्ह्यातील देवाडा सिमा नाक्यावर ट्रक धारकाकडून होत असलेल्या अवैध वसुलीबाबत**

**(५३) * १८१८१ श्री.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागो गाणार, श्रीमती शोभाताई फडणवीस : तारांकित प्रश्न क्रमांक ११०८६ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या देवाडा सिमा नाक्यावर ट्रक धारकाकडून अवैध वसुली प्रकरणात नागपूर व वर्धा एस.सी.बी. पथकाने दिनांक ९ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास धाड टाकून संबंधीत अधिकारी व कंत्राटी कर्मचारी यांना अटक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध वसुली करणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.

(२) याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून खटला दाखल करण्याबाबत प्रस्ताव अद्याप प्राप्त झालेला नाही. तो प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे तांबळडेग (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) गावातील जुने विद्युत उपकरणे बदलून नवीन उपकरणे बसविणेबाबत**

**(५४) * १८२२२ श्री.नागो गाणार :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे तांबळडेग (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) गावातील विद्युत पुरवठा करणारी उपकरणे, विजेचे खांब, तारा, ब्राकेट्स यांना गंज पकडल्याने विद्युत पुरवठ्याला धोका निर्माण झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तांबळडेग ग्रामपंचायत तसेच लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी मा.ऊर्जा मंत्री यांच्याकडे सदर धोकादायक उपकरणे बदली करण्याबाबत तसेच वीजपुरवठा सुरळीत करण्याबाबत रितसर पत्र देऊनही कोणतीच कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार तांबळडेग गावातील गंज पकडलेली विद्युत उपकरणे बदलून नवीन उपकरणे बसविणे व विद्युत पुरवठा पुर्ववत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) विद्युत पुरवठ्याला धोका निर्माण झाला, हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. सदर पत्राच्या अनुषंगाने महावितरण कंपनीने सर्वेक्षण करुन अतिशय जीर्ण ४ पोल ११ के.व्ही. वीज वाहिनीचे अत्यंत सडून धोकादायक झालेले असल्याने, पोलवरील सामानासह माहे डिसेंबर, २०१५ बदलले आहेत. तसेच तांबळडेग वेताळ या भागामध्ये असलेले १०० के.व्ही.ए. चे रोहित्रांचे बुशींग रॉड खराब झालेले आढळल्यामुळे ते माहे १० फेब्रुवारी, २०१६ रोजी बदलण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महावितरण, महानिर्मिती व महापारेषण मधील कंत्राटी कर्मचा-यांना सेवेत नियमित करण्याबाबत

**(५५) * १४८८७ श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, डॉ.अपूर्व हिरे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वीज नियमक आयोगाने सन १९८२ ते २००९ या कालावधीत राज्यातील सरकारी वीज कंपन्यांच्या नोकर भरतीवर बंदी घातल्याने राज्यात महावितरण, महानिर्मिती व महापारेषण या कंपन्यांनी ३२००० कंत्राटी कर्मचा-यांची भरती केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचारी हे प्रतिमहा रूपये १०,०००/- पगारावर मागील १५ वर्षापासून काम करत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांनी त्यांना नियमित कामगार म्हणुन सेवेत घेणेसाठी माहे सप्टेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान २८ दिवसाचे आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कंत्राटी कर्मचा-यांनी त्यांना नियमीत कामगार म्हणुन सेवेत सामावून घेण्याच्या संदर्भातील सध्याचे कामगार कायदे, विविध राज्यांनी याबाबत घेतलेले निर्णय व त्याचे परिणाम, मा.न्यायालयांचे याबाबतचे निर्णय/प्रकरण यांचा सविस्तर अभ्यास करण्यासाठी कार्यकारी संचालक (मानव संसाधन) महानिर्मिती यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(६) असल्यास, सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा व अनुभव विचारात घेता त्यांना शासन सेवेत नियमीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अंशत: खरे आहे, सदर कंपन्यांकडून कामाच्या स्वरुपानुसार, प्रासंगिक तसेच तात्पुरती कामे कंत्राटदाराकडून निविदा प्रक्रियेच्या माध्यमातून करून घेतली जातात.

(२) कंत्राटदारामार्फत तांत्रिक कामगारांची सेवा गरजेप्रमाणे घेण्यात येते, त्यामुळे अशी बाब नाही.

(३) दिनांक १ सप्टेंबर, २०१५ पासून कंत्राटी कामगारांच्या विविध मागण्यांकरिता कृती समितीने मुख्य कार्यालय, प्रकाशगड येथे धरणे आंदोलन केले होते, ही बाब खरी आहे.

(४), (५) व (६) याबाबत कार्यकारी संचालक महानिर्मिती यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. ती समिती कामगार कायदे/विविध राज्यांचे कंत्राटी कामगारांबाबत घेतलेल्या निर्णयांचा अभ्यास व परिणाम, उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाच्या निकालांचा/प्रकरणांचा अभ्यास, महाराष्ट्र विधानमंडळातील या संदर्भातील कामकाजाचा अभ्यास करून अहवाल सादर करणार आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईत परदेशी बनावटीची वाहने बेकायदेशीररित्या आणून त्यांची विक्री होत असल्याबाबत**

**(५६) * १६३५९ श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत परदेशी बनावटीची चौपाटीच्या वाळूवर चालणारी चारचाकी वाहने सरकारी टॅक्स व ड्युटी न भरता बेकायदेशीररित्या भारतात आणून त्यांची विक्री होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार बेकायदेशीररित्या होत असलेल्या विक्रीला प्रतिबंध करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) येलोगेट पोलीस ठाणे, मोटार वाहन चोरी विरोधी पथक, गु.प्र.शा. गु.अ.वि. मुंबई यांचेकडून दोन परदेशी दुचाकी बनावट वाहने कलम १०२ फौ.दं.प्र.सं. अन्वये जप्त करण्यात आली असून बनावट नंबरप्लेट लावून वापरण्यात आल्याबाबत गु.र.क्र. ०५/२०१६ कलम ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४२० भा.दं.वि.अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाहन चोरी विरोधी पथक, गु.प्र.शा.गु.अ.वि. मुंबई यांचेमार्फत चौकशी सुरु आहे. तसेच या संदर्भात परिवहन आयुक्त कार्यालयामार्फत मुंबईतील प्रादेशिक परिवहन कार्यालयांना अशा वाहनांसंदर्भात मोटार वाहन अधिनियम, १९८८ तसेच मुंबई मोटार वाहन कर कायदा, १९५८ अंतर्गत उचित कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड बसस्थानकातुन पुणे, औरंगाबाद आणि मुंबई करिता थेट शिवनेरी बससेवा सुरु करण्याबाबत

**(५७) * १५९४४ श्री.अमरसिंह पंडित, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक ११८३५ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यमार्ग परिवहन महामंडळाने शिवनेरी श्रेणीतील ५०० गाड्या भाडे तत्वावर घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड बसस्थानकातुन पुणे, औरंगाबाद आणि मुंबई करिता थेट शिवनेरी बससेवा सुरु करण्याची मागणी लोकप्रतिनिधी व प्रवाशांनी केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड बसस्थानकातुन शिवनेरी सेवा आणि बीड-औरंगाबाद धर्तीवर पुणे व मुंबई करिता विना थांबा सेवा सुरु करण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे,

(४) तसेच अवैध प्रवासी वाहतुक बंद करण्यासाठी यशवंती ही मिनी बस जिल्ह्यातील सर्वाधिक रहदारीच्या रस्त्यांवर सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून प्रवासी आणि लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या मागणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही.

(२) होय.

(३), (४) व (५) सध्या बीडहून मुंबईकरिता १८.०० वा सुटणारी बीड-मुंबई व १९.०० वाजता सुटणारी माजलगाव-मुंबई या रातराणी फेऱ्या शिवनेरी बसेस उपलब्ध नसल्यामुळे निमआराम (पुशबॅक) आरामदायी बैठक व्यवस्था असलेल्या बसेसद्वारे प्रवाशांच्या सोईसाठी दिनांक २२/११/२०१५ पासून सुरु करण्यात आलेल्या आहेत. बीड बसस्थानकातून पुणे व मुंबई मार्गावर धावणाऱ्या बसेसना प्रवाशी प्रतिसाद व प्रवाशी मागणीनुसार थांबे देण्यात आलेले आहेत.

अवैध प्रवासी वाहतुक बंद करण्यासाठी पोलीस अधिक्षक, बीड व उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड यांना राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर पत्रव्यवहाराद्वारे पाठपुरावा करण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे. तसेच सर्वाधिक रहदारीच्या रस्त्यावर बीड विभागामार्फत परिवर्तन बसेस चालनात आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात शेतकऱ्यांना कृषी पंपाची जोडणी देण्याबाबत**

**(५८) * १६११० श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वीज जोडणीसाठी पैसे भरलेल्या शेतकऱ्यांना माहे मार्च, २०१६ पर्यंत कृषीपंपाची जोडणी देणार असल्याची मा.मुख्यमंत्री यांनी माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान घोषणा केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऊर्जा विभागाने राज्यातील चंद्रपूर, गडचिरोली, ठाणे, रायगड व रत्नागिरी या पाच जिल्ह्यांमध्ये सन २०१४-२०१५ साठी १४ हजार कृषी पंपाच्या वीज जोडणीचे उद्दिष्टे ठेवले होते, प्रत्यक्षात मात्र केवळ ५ हजार कृषीपंपानाच वीज मिळाली असून निदेशांची योग्य अंमलजावणी करण्यात न आल्याने राज्यातील कृषीपंपाच्या विद्युतीकरणाचा अनुशेष प्रचंड प्रमाणात वाढल्यामुळे राज्यातील शेतकरी हवालदिल झाले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शेतकऱ्यांना कृषीपंपाच्या जोडण्या देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशत: खरे आहे. राज्यात मार्च, २०१५ अखेर पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषीपंपाना जून, २०१६ अखेर वीजजोडणी देण्याची घोषणा मा. मुख्यमंत्री महोदयांनी केली आहे.

(२) अंशत: खरे आहे. चंद्रपूर, गडचिरोली, ठाणे, रायगड व रत्नागिरी या पाच जिल्हयांमध्ये सन २०१४-१५ साठी १४००० कृषीपंपाच्या वीजजोडणीचे उद्दिष्ट ठेवले होते. या जिल्हयांमध्ये सन २०१४-१५ मध्ये ८२४२ इतक्या कृषीपंपाचे ऊर्जीकरण झाले आहे. तसेच सन २०१५-१६ मध्ये जानेवारी, २०१६ पर्यंत ८७८७ इतक्या कृषीपंपाना वीज जोडण्या दिल्या आहेत. उर्वरित उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने महावितरण कंपनीकडून कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाड्यातील आठ जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या सातबारावर पिकांच्या नोंदी केल्या नसल्याबाबत

**(५९) * १६३४६ श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील आठ जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या सातबारावर पिकांच्या नोंदीच केल्या नसल्याने दुष्काळी अनुदान मदत वाटपास विलंब होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यात दुष्काळी अनुदान वाटपासाठी आलेले रूपये ११५६ कोटी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात कसे जमा करायचे असा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खेर आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पिकांची नोंद न घेणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच, शेतकऱ्यांच्या पिकांची नोंदी घेवून त्यांना मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तलासरी (जि.पालघर) येथे दादरा-नगर-हवेलीतून होणारी बेकायदा दारुची वाहतूक रोखण्याचा प्रयत्न करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मारहाण झाल्याबाबत

**(६०) * १८१३७ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलासरी (जि.पालघर) येथे दादरा-नगर-हवेलीतून होणारी बेकायदा दारुची वाहतूक रोखण्याचा प्रयत्न करणाऱ्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कर्मचाऱ्यांना मारहाण झाल्याची घटना माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अशा प्रकारच्या घटना घडू नये म्हणून शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.
(२) प्रस्तुत प्रकरणी दिनांक ५/२/२०१६ रोजी तलासरी पोलीस ठाणे येथे गुन्हा क्र.२०/२०१६ अन्वये तक्रार दाखल करण्यात आली असून भारतीय दंड संहिता कलम क्र.३९५, ३९७ व इतर कलमांद्वारे चौकशी सुरु आहे.
(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी चौकशी सुरु असून अशा प्रकारच्या घटना घडू नयेत याकरीता राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना पोलीस विभागाच्या सहकार्याने अवैध मद्य निर्मिती, विक्रीवर नियंत्रण ठेऊन कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्हयात घरावरुन व घराच्या बाजूने जाणाऱ्या विद्युत तारांना कोटींग करण्याबाबत

**(६१) * १४८३९ श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) शहरात महावितरणाने घराजवळून वा घरावरुन जाणाऱ्या विद्युत तारांना कोटींग न केल्याने शिवाजीनगर भागात बांधकाम करणाऱ्या कामगारांचा विजेच्या तारांना स्पर्श लागून मृत्यू झाल्याची घटना माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घडल्याचे निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार कुडाळसह सिंधुदुर्ग जिल्हयात घरावरुन वा घराच्या बाजूने जाणाऱ्या विद्युत तारांना कोटींग करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी विद्युत निरीक्षक, विद्युत निरीक्षण विभाग, सिंधुदुर्ग कार्यालयामार्फत चौकशी केली असून सदर धोकादायक बांधकाम सुरु असल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर महावितरणच्या कुडाळ शहर शाखा कार्यालयाकडून संबंधित जागा मालकास वीज वाहिनी सुरक्षित अंतरावर स्थलांतरीत करेपर्यंत बांधकाम स्थगित करण्याची सूचना दि. १७.११.२०१५ रोजी लेखी स्वरुपात देण्यात आली होती. तथापि, त्या जागा मालकाने महावितरणच्या सूचनेकडे दुर्लक्ष केल्याने सदर अपघात झाल्याचे चौकशीत दिसून आले.

(३) संबंधित घरमालक व ठेकेदारास नुकसान भरपाईकरीता दि. २२.०२.२०१६ रोजी विद्युत निरीक्षकांनी पत्र दिले आहे. बांधकाम ठेकेदार श्री.दिलीप परशुराम मांजरेकर यांच्याकडून मयत श्री.पुंडलीक खेमप्पा राठोड यांची पत्नी श्रीमती सोनाबाई राठोड यांना रु. ६५,०००/- अपघातानंतर रोख स्वरुपात दि. १९.०१.२०१६ रोजी रु. ३५,०००/- व बँक ऑफ बडोदा, शाखा कुडाळ, बँकेचा धनादेश क्र. ००००७२ रु. ५०,०००/- एकूण १,५०,०००/- इतकी नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे. सिंधुदूर्ग जिल्हयात घराजवळून व घरावरुन गेलेल्या धोकादायक विद्युत तारा सुरक्षित अंतरावर स्थलांतरीत करण्याविषयी अंदाजपत्रके तयार करुन मंजुरीसाठी जिल्हा नियोजन व विकास समितीकडे सादर करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अभिनेत्री हेमामालिनी यांच्या नाट्य विहार केंद्राला दोन हजार चौरस मीटरचा भूखंड केवळ ७० हजार रुपयात दिल्याबाबत

**(६२) * १५२६७ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अभिनेत्री व खासदार हेमा मालिनी यांच्या नाट्यविहार कला केंद्र चॅरीटी ट्रस्ट या संस्थेला सांस्कृतिक संकुल उभारण्यासाठी अंधेरीतील (मुंबई) आंबिवली येथील दोन हजार चौरस मीटर जमीन शासनाने दिनांक २३ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील उद्यानासाठी आरक्षित असलेला भूखंड देण्यात आला असून १९७६ च्या रेडीरेकरनचा दर आकारण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच दोन वर्षापूर्वी भारताचे महालेखापाल आणि नियंत्रक (कॅग) यांच्या अहवालात उपरोक्त जमीन वाटपाच्या प्रस्तावाची प्रक्रिया पारदर्शक नसल्याबद्दल आक्षेप घेतला होता, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कॅगचे आक्षेप असतानाही जमीन देण्याचा निर्णय कोणत्या नियमानुसार व निकषानुसार घेण्यात आला आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(६) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार उक्त प्रकरणी कॅगच्या अहवालानुसार अनियमितता झालेली असल्यामुळे याप्रकरणी दोषी असलेल्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मौजे आंबिवली, तालुका अंधेरी येथील प्रश्नाधीन सर्वे क्र.१०९अे/१, न.भू.क्र.३ (पै) २००० चौ.मी. क्षेत्रावरील उद्यान हे आरक्षण वगळून सदर क्षेत्र, शासन अधिसूचना, नगरविकास विभाग क्र.टीपीबी-४३०७/१३६६/सीआर-३०४/२००७ नवि-११, दिनांक ३०/७/२०१० अन्वये "नाट्य विहार कला केंद्रा" करिता आरक्षित करण्यात आले आहे.

नाट्य विहार कलाकेंद्र चॅरिटी ट्रस्ट ही एक सांस्कृतिक संस्था असल्याने नाट्यविहार कला केंद्रासाठी वरीलप्रमाणे आरक्षित असलेला २००० चौ.मी.क्षेत्राचा वर उल्लेखित भूखंड शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक ८/२/१९८३ आणि दिनांक ११/५/१९८४ मधील तरतुदीनुसार दिनांक १/२/१९७६ रोजीच्या मुल्यांकनाच्या २५% इतकी कब्जेहक्काची रक्कम आकारून काही अटी/शर्तीवर शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, दिनांक २३/१२/२०१५ अन्वये नाट्यविहार कला केंद्र चॅरीटी ट्रस्ट या संस्थेला मंजूर करण्यात आला आहे.
(३) व (४) प्रश्नाधीन जमीनीच्या वाटपाचे ज्ञापन दिनांक २३/१२/२०१५ रोजी निर्गमित झाले असल्याने भारताचे नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांच्या २ वर्षापूर्वीच्या अहवालात त्याविषयी आक्षेप घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही. सदर ट्रस्टला प्रश्नाधीन जमीन मंजूर करण्याची कार्यवाही शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक ८/२/१९८३ आणि दिनांक ११/५/१९८४ मधील धोरणानुसार करण्यात आली आहे.

(५), (६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गोसीखुर्द प्रकल्पामुळे बाधीत झालेल्या कुटुंबाचे पुनर्वसन करणेबाबत**

**(६३) * १७६६३ श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.राजेंद्र जैन, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन २०१३ मध्ये रुपये १२०० कोटीचे पॅकेज गोसीखुर्द प्रकल्पाला दिले होते त्यापैकी किती निधी खर्च झाला,

(२) असल्यास, गोसीखुर्द प्रकल्पामुळे बाधीत झालेल्या कुटुंबाचे पुनर्वसन करण्यासाठी रु. २४० कोटी इतका निधी शासनाने उपलब्ध करुन दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुनर्वसनाची कोणकोणती कामे शिल्लक आहेत, या निधीतून शासनाने प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याचे दृष्टीने कोणकोणती कामे हाती घेण्यात येणार आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर पुनर्वसनाची कामे किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहेत तसेच, गोसीखुर्द प्रकल्पामुळे बाधीत झालेल्या कुटुंबाचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) गोसीखुर्द पॅकेज अंतर्गत नागपूर जिल्हयात रु. ४५९.७३ कोटी खर्च झालेला आहे व भंडारा जिल्हयात रु. २९७.९६ कोटी खर्च झालेला आहे असा एकूण रु. ७५७.६९ कोटी खर्च झालेला आहे.

(२) गोसीखुर्द प्रकल्पामुळे बाधित झालेल्या कुटुंबाचे दर्जेदार पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने पुनर्वसीत गावठाणातील नागरी सुविधेच्या देखभाल व दुरुस्तीसाठी जलसंपदा विभाग, शासन पत्र दिनांक २६/०३/२०१५ अन्वये नागपूर व भंडारा जिल्हा मिळून रक्कम रु. ७.५२ कोटी (नागपूर जिल्हयासाठी ३.५९ कोटी) व महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय दिनांक १२/०२/२०१६ नुसार गोसीखुर्द प्रकल्पांतर्गत पुनर्वसीत गावठाणामधील नागरी सुविधांच्या दुरुस्ती व

देखभालीकरीता प्रकल्पांतर्गत नागरी सुविधांवरील मुळ खर्चाच्या २५% मर्यादेत व सद्यस्थितीत ७४.९८ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यास मान्यता प्रदान केलेली आहे.

(३) नागपूर जिल्ह्यातील गोसीखुर्द प्रकल्पातील ५१ बाधित गावाचे ३६ पर्यायी स्थळी पुनर्वसन करण्यात येत असून, पैकी ३४ पर्यायी स्थळांपैकी ३२ पर्यायी स्थळी १८(१३+५) नागरी सुविधांची कामे पूर्ण झालेली असून, २ (रेंगातुर व क-हांडला) पर्यायी स्थळी १३ नागरी सुविधांची कामे पूर्ण झालेली आहे. ५ नागरी सुविधांची कामे सुरु आहे. उर्वरित २ पर्यायी स्थळासाठी (मौजा-टेकेपार (चिरव्हा) व रुयाड) मध्ये भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीत आहे. नागपूर जिल्ह्यातील ५१ बाधित गावातील प्रकल्पग्रस्त कुटुंबापैकी २० गावातील प्रकल्पग्रस्त कुटुंबे पुर्णपणे स्थलांतरीत झालेली असून, उर्वरित ठिकाणी स्थलांतरणाची कार्यवाही सुरु आहे. सद्यस्थितीत ८३४८ कुटुंबापैकी ६०९१ कुटुंबाचे पर्यायी स्थळी स्थलांतरण झालेले आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेतात काम करीत असताना मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना विमा योजना लागू करणेबाबत

**(६४) * १५७३५ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतात काम करत असताना अपघातामुळे मृत्यूमूखी पडणाऱ्या शेतकऱ्यांच्या वारसांना शासनातर्फे व्यक्तिगत विमा योजनेतर्फे आर्थिक मदत केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे वसई तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांच्या वारसांना त्यांचा लाभ मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत वसई तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते मायकल फुटयार्डो यांनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान कृषी आयुक्त तसेच शासनाकडे मदत मिळण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) श्री.मायकल फुट्यार्डो यांचे डिसेंबर, २०१५ मधील वा त्या दरम्यानचे कोणतेही निवदेन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वडवणी (जि.बीड) तालुक्यातील मौजे चिंचोटी व मौजे मामला येथील भुसंपादन झालेल्या शेतकऱ्यांना मावेजा मिळण्याबाबत

**(६५) * १६१६७ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडवणी (जि.बीड) तालुक्यातील मौजे चिंचोटी व मौजे मामला येथील तलावाकरिता सन १९७६ मध्ये शासनाने येथील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तलावाचे काम पूर्ण झाले असून शेतकऱ्यांना केवळ रूपये ७०० ते ८०० प्रती एकर मावेजा मिळाला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याच काळात (माजलगाव) पुर्वाश्रमीचा तालुक्यातील जमिनीचे तलावाकरिता भुसंपादन झाले होते त्या शेतकऱ्यांना लाखो रुपये प्रती एकर मिळाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चिंचोटी व मामला येथील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, भुसंपादन अधिकारी, विभागीय आयुक्त, महसूल यांना वारंवार पत्रव्यवहार करूनही मावेजा मिळण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) होय.

(३) नाही. इ.स. १९७६ मध्ये संपादीत मौ.नांदुर येथील सं.क्र.२५/७७ मध्ये कलम ११ च्या अंतिम निवाडयानुसार भुसंपादन अधिकाऱ्याने प्रती आर रु.५०/- इतका मावेजा दिला. त्यावर शेतकऱ्यांनी नाराज होऊन कलम १८ नुसार मा.न्यायालयात एलएआर क्र ५०९/८६ दाखल केला त्यावर मा.न्यायालयाने दि.२२/०८/१९८८ रोजी आदेश देऊन रु.२५० प्रति आर इतका मावेजा मंजुर केला आहे.

(४) उपविभागीय अधिकारी माजलगाव या कार्यालयात उपलब्ध असलेल्या मौ.चिंचोटी संचिका क्र.११/७५, व मौ.मामला संचिका क्र.२७/७४ यात संबंधित शेतकऱ्याने केलेला पत्रव्यवहार दिसुन येत नाही.

(५) सदर प्रकरणात कलम ११ नुसार मावेजा वाटप करण्यात आलेला आहे. वास्तविक वाढीव मावेजासाठी संबंधित शेतकऱ्यांनी कलम १२(२) च्या नोटिसा मिळाल्यानंतर ४२ दिवसाच्या आत निषेध नोंदवुन कलम ११ चा मावेजा घेतल्यानंतर कलम १८ अन्वये मा.न्यायालयात दावा दाखल करणे अभिप्रेत होते.तथापि सदर प्रकरणात मा.चिंचोटी व मौ .मामला येथील तलावाकरीता संपादित झालेल्या जमिनीच्या अनुषंगाने संबंधित शेतकऱ्यांनी विहीत मुदतीच्या आत मा.न्यायालयात कलम १८ खाली दावे दाखल केलेले नाहीत. याबाबत कलम १८ च्या कार्यवाही नुसार वाढीव मावेजा संबंधात शेतकऱ्यांनी मा. दिवाणी न्यायालयाकडे दाद न मागितल्याने त्यांना कलम १८ नुसार किंवा कलम २८(अ) नुसार वाढीव मावेजा देणे, राज्य शासनावर कायद्यानुसार बंधनकारक नाही.

(६) भुसंपादन अधिनियम, १८९४ अन्वये जर भुसंपादनबाबतचा कलम ११ चा निवाडा जर संबंधित शेतकऱ्यांना मान्य असेल तर याबाबत वाढीव मावेजा देणे हे कायद्यानुसार शासनावर बंधनकारक नाही. त्यामुळे शासनाने याबाबत कसलीही कार्यवाही करणे अभिप्रेत नाही.

(७) विलंबाचा प्रश्नच उद्भवत नाही.

----------------

## राज्यात दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी केंद्र शासनाने राज्य शासनाला मदत मिळाली नसल्याबाबत

**(६६) * १५५३७ श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.बंटी पाटील :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी केंद्र शासनाची राज्य शासनाला मदत मिळाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाला केंद्र शासनाकडून किती अनुदान मंजूर झाले आहे व प्रत्यक्ष राज्य शासनाकडे किती रक्कम जमा झालेली आहे व किती रकमेचा विनियोग राज्य शासनाने केलेला आहे,

(३) राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी जास्तीत जास्त मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) केंद्र शासनाकडून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी रु.२५४८.७३ कोटी इतके अनुदान मंजूर झाले असून प्रत्यक्षात राज्य शासनाकडे रु.६३७.१८ कोटी इतकी रक्कम जमा झाली आहे. राज्य शासनाने याबाबींसाठी आतापर्यंत रु.२५३६.०४ कोटी इतका निधी वितरीत केला आहे.

(३) राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी शासन निर्णय दिनांक २४ जुलै, २०१५ अन्वये शासनाने विविध विभागामार्फत विशेष मदतीचा कार्यक्रम राबविण्याबाबत मंजूरी दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**परभणी जिल्हयातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(६७) * १५०५० श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.रामराव वडकुते, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक ११७७४ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील ३ लक्ष ९६ हजार हेक्टर पिकांच्या नुकसानीपोटी जिल्हा प्रशासनास रूपये ४०० कोटींची आर्थिक मदत देण्याबाबत मा.मदत व पुनर्वसन मंत्री महोदयांनी हिवाळी अधिवेशन, २०१५ मध्ये मागणी प्रस्तावीत केल्याचे आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील आश्वासनाप्रमाणे रूपये ४०० कोटींची मदत देण्याऐवजी केवळ रूपये १११ कोटी देऊन परभणी जिल्हयातील शेतकऱ्यांवर अन्याय केल्याचा आक्षेप परभणी-हिंगोली जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान नोंदवला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार परभणी जिल्हयातील कापूस क्षेत्रास अनुदान मंजुर करणे व जिल्हयातील शेतकऱ्यांना ४०० कोटींची आर्थिक मदत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) दि. २.१.२०१६ व दि. २४.२.२०१६ या शासन निर्णयान्वये परभणी जिल्ह्याकरिता रु.१५५.७५ कोटी व हिंगोली जिल्ह्याकरिता रु.१५६.८१ कोटी इतका मदत निधी वितरीत करण्यात आला आहे.

लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोद्यांकडे जानेवारी, २०१६ वा त्यादरम्यान नोंदवलेल्या आक्षेपाबाबतची माहिती विभागाकडे आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) औरंगाबाद, नाशिक, अमरावती व नागपूर विभागातील कापूस, नागपूर-अमरावती विभागातील सोयाबीन व नागपूर विभागातील धान पीक उत्पादक शेतकऱ्यांना तसेच दुष्काळ जाहीर केलेल्या १५७४७ गावांमधील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दि.२.३.२०१६ च्या शासन निर्णयान्वये विशेष मदत जाहीर केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---------------------------

## वेंगुर्ले (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील मोचेमाड खाडीतील वाळू लिलावास घालण्यात आलेली बंदी उठविण्याबाबत

**(६८) * १५४७६ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात वाळू लिलाव बंदीचा आदेश उठविण्यात आला मात्र मोचेमाड या खाडीतील वाळू लिलावास बंदी करण्यात येऊन वेंगुर्ले तालुक्यावर अन्याय करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार वेंगुर्ले तालुक्यातील मोचेमाड खाडीतील वाळू लिलावास घालण्यात आलेली बंदी उठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) सागरी किनारपट्टी विनियमन (CRZ) क्षेत्रामध्ये वाळूचे उत्खनन फक्त नौकायनय मार्ग सुकर करण्यासाठी करता येते. त्यासाठी शासन निर्णय दि. २१/५/२०१५ अन्वये कोकण सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातील नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू उत्खननाकरीता धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने सर्वेक्षण करुन याबाबतचा प्रस्ताव तयार करावयाचा आहे. मोचेमाड खाडीचा भौगोलिकदृष्टया विचार करता या खाडीमध्ये मालवाहतूक करणे शक्य नसल्याने, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून या खाडीमधील वाळू उत्खनन प्रस्तावित करण्यात आले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) तालुक्यातील धुतूम गावातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना नोकऱ्या देण्याबाबत

**(६९) * १५३६८ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) तालुक्यातील धुतूम गावातील सुमारे ९० शेतकऱ्यांची ६० ते ७० एकर जमीन संपादन करुन त्यावर सन १९९८ मध्ये आयओटीएल हा प्रकल्प उभा राहिला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांना नोकऱ्या मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

उरण तालुक्यातील धुतूम गावासह २७ गावांच्या जमिनी शासनाने नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित केलेल्या आहेत. आयओटीएल कंपनीसाठी स्वतंत्र भूसंपादन झालेले नसून प्लॉट नं. १०१ सिडकोने आयओटीएल कंपनीला भाडेपट्टयाने दिला आहे. तसेच सिडकोच्या नवी मुंबई प्रकल्पास महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम लागू नाही. तथापि, आयओटीएल कंपनीने धुतूम गावातील ३० पेक्षा जास्त कामगारांना कंत्राटी स्वरुपात कामावर घेतले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर-वैभववाडी (गगनबावडा मार्गे) कोकण रेल्वे मार्ग जोडण्याच्या प्रस्तावाबाबत

**(७०) * १६१३५ श्री.सतेज (बंटी) पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर-वैभववाडी (गगनबावडा मार्गे) कोकण रेल्वे मार्ग जोडण्याचा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावानुसार शासनाकडून सर्व्हे करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, कोल्हापूर-कोकण (कोल्हापूर-वैभववाडी) रेल्वे मार्ग जोडणाऱ्या प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे,
(४) अद्याप, उक्त विषयी राज्य शासन केंद्रीय रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा करीत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय
(२) कोकण रेल्वे महामंडळाकडून सदर प्रकल्पाचा सर्व्हे करण्यात आला आहे
(३) केंद्र शासनाने सन २०१६-१७ च्या रेल्वे अर्थ संकल्पात वैभववाडी ते कोल्हापूर या नवीन रेल्वे प्रकल्पास मंजूरी दिली आहे.
(४) होय.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात कृषी विभागाच्या माध्यमातून पुरविण्यात येणाऱ्या अवजाराच्या संख्येत कपात होत असल्याबाबत

**(७१) * १७४१७ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात राष्ट्रीय कृषी विस्तार व तंत्रज्ञान अभियानांतर्गत कृषी यांत्रिकीकरण उप अभियानातून शेती औजाराचा लाभ देण्यासाठी दीड महिन्यापूर्वी निश्चित केलेल्या उद्दिष्टात दीड हजार औजारांची कपात करण्यात आल्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकरी औजारांपासून वंचित राहणार असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात कृषी विभागाच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या राष्ट्रीय कृषी विस्तार व तंत्रज्ञान अभियानांतर्गत रूपये ३१ कोटी ९२ लक्ष अनुदान शासनाने मंजूर केले असून त्याकरीता ८ हजार ५६५ अवजारांपैकी विदर्भातील शेतकऱ्यांच्या हाती केवळ १ हजार ८९५ अवजाराचा लाभ मिळणार असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार अवजारांची करण्यात आलेली कपात रद्द करून शेतकऱ्यांना मोठया संख्याने अवजाराचा लाभ होण्याकरीता अवजारे पुरविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाने कृषी अभियांत्रिकीकरण उप अभियानातंर्गत एप्रिल, २०१५ मध्ये केंद्र राज्य हिश्याचे प्रमाण ५०:५० नुसार, केंद्र व राज्य हिश्याचे प्रत्येकी रु.१५.९६ कोटी, याप्रमाणे एकूण ३१.९२ कोटी रकमेच्या कार्यक्रमास मंजूरी दिली होती. सदर उप अभियानांतर्गत राज्यातील एकूण ८,५६५ लक्षांकांपैकी, विदर्भासाठी १,८९५ लक्षांक देण्यात आला होता.

नोव्हेंबर, २०१५ मध्ये केंद्र राज्य हिश्श्याच्या प्रमाणात ६०:४० असा बदल करण्यात आल्याचे केंद्र शासनाने कळविले. तथापि, केंद्राच्या मंजूर अनुदानात बदल होणार नाही, असेही केंद्र शासनाने कळविले. बदललेल्या केंद्र व राज्य हिश्श्याच्या प्रमाणानुसार केंद्र हिश्श्याच्या रु.१५.९६ कोटी निधीच्या प्रमाणात, राज्य हिस्सा रु.१०.६४ कोटी झाला असून, एकूण कार्यक्रम रु.२६.६० कोटी रकमेचा झाला आहे. त्यामुळे लक्षांकामध्ये घट झाली असून, आता राज्यामध्ये निर्धारित केलेल्या एकूण ७,०४३ लक्षांकापैकी विदर्भासाठी १,५३० सुधारित लक्षांक देण्यात आला आहे.

सन २०१०-२०११ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या कृषी गणनेनुसार, जिल्हानिहाय खातेदार विचारात घेऊन, सदर उपअभियानांतर्गत लक्षांक देण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील द्राक्ष लागवडीत पिके धोक्यात आल्याबाबत

**(७२) * १४९०८ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड (जि.नाशिक) तालुक्यात कॅम्सन कंपनीच्या कॅल्नोवा या रोगप्रतिबंधक औषधामुळे शेकडो हेक्टर शेतीमधील द्राक्षांना काळे डाग पडल्याने शेकडो द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या द्राक्ष लागवडीची पाहणी करून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, चौकशी केली आहे.

चौकशीमध्ये द्राक्ष पिकांवरील फुलकीडे व माइट्स या किडीच्या नियंत्रणासाठी नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कॅम्पसन बायोटेक्नॉलॉजी लि.कंपनीच्या कॅलनोव्हा या औषधाची फवारणी केल्यामुळे द्राक्ष मण्यांवर काळे ठिपके/डाग पडून द्राक्ष पिकाचे नुकसान झाल्याचे तक्रार निवारण समितीच्या निदर्शनास आलेले आहे.

(३) तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीने निफाड तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या प्लॉट मधील द्राक्ष घडांचे व कीटकनाशकांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविलेले आहेत. त्याबाबतचा प्रयोगशाळेतील अहवाल प्राप्त झाल्यानंतर अंतिम निष्कर्षानुसार व कायद्यांतर्गत नमुने तपासणी अहवालानुसार सदर कंपनीवर कीटकनाशक कायदा १९६८ नुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

तसेच कायद्यांतर्गत काढलेल्या व अप्रमाणित आढळून आलेल्या कॅल्नोवा औषधांचा तीन नमुन्यांचा प्रकरणात संबंधित उत्पादक व वितरक यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यात कन्व्हेअर बेल्ट रात्रीच्यावेळी सुरु असल्याबाबत

**(७३) * १५९७५ श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील केळशी किनारी व उंबर शेत गावच्या सीमेवर उभारलेल्या कन्व्हेअर बेल्ट बंद ठेवण्याचे आदेश महसूल विभागाचे असताना हा बेल्ट दिवसा बंद ठेऊन रात्रीच्यावेळी छुप्या पध्दतीने कन्व्हेअर बेल्ट सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशी काय आढळून आले व तद्नुसार शासनाचे (महसूल विभागाचे) आदेश झुगारुन रात्रीच्यावेळी कन्व्हेअर बेल्ट सुरु ठेवणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) मे. आशापुरा माईन केम लि. या कंपनीच्या बॉक्साईट उत्खननामुळे पर्यावरण ऱ्हास, ध्वनीप्रदुषण,ग्रामस्थांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे अशा स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्याने तहसिलदार, दापोली यांनी त्यात चौकशी केली आणि सदर कंपनीने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील तदतुदी अन्वये औद्योगिक अकृषिक परवानगी न घेता विषयांकित जमिनीचा अनधिकृत औद्योगिक बिनशेती वापर केल्याचे निदर्शनास आल्यावरुन तहसिलदार, दापोली यांनी दि. ६/१/२०१६ रोजी कंपनीस अनधिकृतरित्या सुरु केलेले कन्व्हेअर बेल्टचे काम तात्काळ बंद करण्याबाबत निर्देश दिले आणि तद्नंतर अनधिकृत औद्योगिक बिनशेती वापराबाबत रु. ६०,०००/- इतकी दंडात्मक रक्कम वसूल केली आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाने देखील दि. २९/१/२०१६ रोजी सदर कंपनीस जल (प्रदुषण नियंत्रण व प्रतिबंध) अधिनियम १९७४, हवा (प्रदुषण नियंत्रण व प्रतिबंध) अधिनियम १९८१ आणि घातक घनकचरा (व्यवस्थापन, हाताळणी व वाहतुक) नियम २००८ अन्वये अंतरिम निर्देश निर्गमित केले आहेत. तसेच उपविभागीय अधिकारी, दापोली यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे

कलम १४२ अन्वये दि. २०/२/२०१६ रोजीचे आदेशान्वये सदर कंपनीस मौजे उंबरशेत व रोवले येथे बॉक्साईट उत्खनन थांबवण्याबाबत आदेश पारित केले असून सदर आदेशाविरुध्द कंपनीने खेड येथील न्यायालयात अपील दाखल केले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील उद्‌योग व्यवसायांसाठी स्वतंत्र अखंडीत वीज पुरवठा यंत्रणा उभारण्याचा प्रस्ताव

**(७४) * १५३३३ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उद्‌योग व्यवसायांना अखंडीत वीज पुरवठा मिळावा या उद्देशाने उद्‌योग व्यवसायांसाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याचा प्रस्ताव महावितरण वीज कंपनीच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, राज्यात माहे जानेवारी २०१६ पासून मागेल त्याला वीज देण्याचा निर्णय महावितरण वीज कंपनीने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्याची अमंलबजावणी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अशंत: खरे आहे, महाराष्ट्र औद्‌योगिक विकास महामंडळा व्यतिरिक्त महाराष्ट्रातील एकत्रित समूहात असलेल्या व गावठाण/ इतर मिश्र वाहिनींद्‌वारे वीज पुरवठा असलेल्या औद्‌योगिक ग्राहकांना अखंडीत वीज पुरवठा मिळावा यासाठी क्षेत्रिय कार्यालयांकडून महावितरण मुख्यालयामार्फत अंदाजपत्रके मागविण्यात येत आहेत.

(२) महाराष्ट्र औद्‌योगिक विकास महामंडळा व्यतिरिक्त महाराष्ट्रातील एकत्रित समूहात असलेल्या व गावठाण / इतर मिश्र वाहिनींद्‌वारे वीज पुरवठा असलेल्या औद्‌योगिक ग्राहकांना अखंडीत वीज पुरवठा मिळावा या बाबतची बैठक

मंत्रालयात दि. १७.०८.२०१५ रोजी घेण्यात आली. सदर बैठकीत असे सूचित करण्यात आले की महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळा व्यतिरिक्त महाराष्ट्रातील औद्योगिक ग्राहकांना एक्सप्रेस फिडर पुरविण्यात यावा जेणेकरुन सदरील ग्राहकांना अखंडीत वीज पुरवठा मिळू शकेल. सदरील बाबतचा निधी शासनाच्या उद्योग विभागाकडून देण्यात येईल. त्यास अनुसरुन महावितरण कंपनी मुख्यालयामार्फत क्षेत्रिय कार्यालयांकडून अंदाजपत्रके मागविण्यात येत आहेत.

(३) हे अंशत: खरे आहे. राज्यातील मागेल त्याला वीज देण्याचे महावितरणचे धोरण असून त्यासाठी आवश्यक असणारी पायाभूत सुविधा उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) राज्यातील मागेल त्याला वीज देण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे वेगवेगळया योजनेअंतर्गत पायाभूत सुविधा उभारण्याचे काम चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्हयात तलाठी पदाची परीक्षा पुन्हा घेण्याबाबत**

**(७५) * १४८१३ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात दिनांक २७ डिसेंबर २०१५ रोजी ९३ केंद्रावर तलाठी पदाची परीक्षा घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुसद परीक्षा केंद्रावर गैरप्रकार करून पेपर फुटीचा प्रकार घडल्यामुळे होतकरू गरीब अभ्यासू परीक्षार्थीवर अन्याय झाला असून तलाठी पदाच्या परीक्षा पुन्हा घेण्याबाबत उपविभागीय अधिकारी, पुसद यांच्याकडे विद्यार्थ्यांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार तलाठी परीक्षा पुन्हा घेण्याबाबत तसेच, परीक्षा केंद्रावर गैरप्रकार करणाऱ्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) यवतमाळ जिल्ह्यात जिल्हा निवड समितीमार्फत दिनांक २७ डिसेंबर, २०१५ रोजी एकूण ९३ केंद्रावर तलाठी पदाची परीक्षा घेण्यात आली होती. सदर परीक्षेदरम्यान पुसद तालुक्यातील परीक्षा केंद्रावर एका परिक्षार्थ्याकडून घडलेल्या गैर प्रकाराच्या अनुषंगाने तलाठी पदाची परीक्षा पुन्हा घेण्याबाबत विद्यार्थ्यांनी दिनांक ३१.१२.२०१५ रोजीच्या निवेदनाद्वारे उपविभागीय अधिकारी, पुसद यांचे मार्फत मागणी केली होती.

उक्त प्रकरणी परीक्षा केंद्रावर गैरप्रकार करणाऱ्या एका परिक्षार्थी विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस विभागामार्फत पुढील तपास सुरु आहे.

(४) तलाठी पदभरती अंतर्गत गुणानुक्रमे विचार क्षेत्रात येणाऱ्या उमेदवारांना दिनांक ०१/०१/२०१६, दिनांक २२/०१/२०१६ व दिनांक २४/०२/२०१६ रोजी जिल्हा निवड समितीची बैठक आयोजित करुन कागदपत्रे तपासणीसाठी बोलविण्यात आले. तसेच दिनांक २२/०१/२०१६ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय, यवतमाळ येथील पोलीस अधिकारी यांनीही कागदपत्रे तपासणीच्या दिवशी हजर राहून उमेदवारांची समक्ष तपासणी करुन उमेदवारांबाबत काही आक्षेपार्ह आढळून आले नसल्याबाबतचे अभिप्राय दिले. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे अधिनस्त तलाठी पदभरती २०१५ ची प्रारुप निवड यादी प्रसिध्द करण्यात आली. त्यामुळे तलाठी परीक्षा पुन्हा घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अंबरनाथ (पश्चिम) शहरातील (जि.ठाणे) एस.टी. बसस्थानकाची झालेली दुरवस्था**

**(७६) * १५६४२ श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (पश्चिम) शहरातील (जि.ठाणे) एस.टी. बसस्थानकाची दुरवस्था झाली असून सदर बसस्थानकात मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य तसेच अत्यंत दुर्गंधी पसरली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय, सद्यस्थितीत सदरचे बसस्थानक वापरात नाही.

(२), (३) व (४) सदर बसस्थानकावरुन चालविण्यात येणाऱ्या फेऱ्या या उल्हासनगर पालिका परिवहन विभाग यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या असल्याने सन २०१० पासून सदरचे बसस्थानक वापरात नाही. अधवा, डहाणू, गिरगांव, चारोटी येथील प्रवाशांना तलासरी येथून पुरेशा प्रमाणात बस सेवा चालनात असल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुपवाडा (जि.सांगली) येथील रस्त्यावरील बालाजीनगर येथे बनावट कृषी औषधांची होत असलेली विक्री

**(७७) * १६०७० श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुपवाडा (जि.सांगली) येथील रस्त्यावरील बालाजीनगर येथे बनावट कृषी औषधांची विक्री होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुकानावरील छाप्यात ११ बनावट औषधाचे डबे जप्त करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी किती वर्षापासून बनावट कृषी औषधाचे दुकान सुरु आहे,

(४) असल्यास, सदर दुकानास कृषी औषध विक्रीचा परवाना आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून बनावट कृषी औषध विक्री करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) सदर विक्री केंद्रास दिनांक १०/०७/२०१५ पासून विक्री परवाना दिलेला असून तेव्हापासून कृषी औषधाचे विक्री दुकान सुरु आहे.

(५) संबंधित विक्रेत्याविरुध्द कीटकनाशक कायद्यानुसार संजयनगर, ता.मिरज, जि.सांगली पोलीस स्टेशनमध्ये वर्दी क्रमांक ०९/१६ दिनांक ०६.०१.२०१६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून त्यांच्या विक्री केंद्राचा किटनाशके व खत परवाना निलंबित करण्यात आलेला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कांचनवाडी (ता.जि.औरंगाबाद) येथील तलाठ्याविरुध्द प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत**

**(७८) * १५५४० श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांचनवाडी (ता.जि.औरंगाबाद) येथील सजाचे तलाठी राजेंद्र बागडे यांच्यामुळे या परिसरातील नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेकायदेशीर फेर घेणे, नातेवाईकांच्या नावावर जमिनी हडपणे, पैसे उकलण्यासाठी फेर देण्यास अडवणूक करणे याबाबत सदर तलाठ्याविरूध्द अनेक तक्रारी केल्या असुन कुठलीही कारवाई करण्यात येत नाही तसेच डीबीस्टार या वृत्तातून (३२ नोटीसा, १६ खुलासे आणि कारणे दाखवा नोटीस) या बाबीच्या तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) तलाठी सजा कांचनवाडी येथील तलाठयाविरुध्द तक्रारी प्राप्त झाल्या होत्या, हे खरे आहे. मात्र प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांनी तहसीलदार, औरंगाबाद यांच्यामार्फत केलेल्या चौकशीत सदर तक्रारीत तथ्य आढळून न आल्यामुळे तक्रारी निकाली काढलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**माढा (जि.सोलापूर) तालुक्यात रब्बी पिकांचे झालेले नुकसान**

**(७९) * १५४१३ श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माढा (जि.सोलापूर) तालुक्यात अल्पशा पावसामुळे रब्बी हंगामातील ज्वारीचे पीक बाटुक झाले आहे तर काही ठिकाणी ज्वारीचे रोप येऊन जळून गेले असल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्वारी आणि वैरणसुध्दा नसल्याने शेतकऱ्यांनी बाटूक काढून घेण्यास सुरुवात केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार शेतकऱ्यांच्या उद्‌भवलेल्या परिस्थितीबाबत शासनाने शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) सन २०१५-१६ च्या रब्बी हंगामात माढा तालुक्यातील ४९,११३ हेक्टर क्षेत्रावर ज्वारी पिकाची प्रत्यक्ष पेरणी झाली. परंतु कमी पावसामुळे पिके करपून गेली. त्यामुळे ज्वारी पिकाचे बाटुक पशुधनासाठी चारा म्हणून शेतकऱ्यांनी उपयोगात आणलेला आहे. सदर रब्बी हंगामाची पैसेवारी घोषित झाल्यानंतर शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासंदर्भात उचित निर्णय घेण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत उपलब्ध होणारे साहित्य स्थानिक स्तरावर उपलब्ध होण्याबाबत

**(८०) * १५२३९ श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत शेतकऱ्यांना लागणारे अवजार व शेतीपयोगी साहित्याचे शासनाद्वारे वाटप करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांनी या शेतीपयोगी साहित्य करिता स्थानिक कृषी अधिक्षकाकडे अर्ज करावा लागतो व कृषी अधिक्षकाने अर्ज मंजूर केल्यानंतर जिल्हा स्थानावरुन लाभार्थ्यांना हे साहित्य वितरीत करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, साहित्याचे वाटप स्थानिक कृषी अधिक्षकाकडूनच होणे अपेक्षित असताना स्थानिक पातळी वर गोदाम व सुरक्षा व्यवस्था नसल्यामुळे सदर साहित्य जिल्हा स्तरावरुन लाभार्थीना वितरीत करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्थानिक पातळीवर या साहित्याकरीता कृषी अधिक्षक कार्यालय व गोदाम शासन स्तरावर बांधण्याचे प्रस्तावित करण्यात येणार आहे काय व किती कालावधीत बांधणे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, प्रस्तावित न करण्याची कारणे व पर्यायी उपाययोजना काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) होय.

(३) नाही. संबंधित सेवा पुरवठादार (महाबीज, कृषी उद्योग महामंडळ) लाभार्थ्यांना थेट पुरवठा करतात.

(४) नाही.

(५) अन्न सुरक्षा अभियानांतर्गत शेतकऱ्यांनी कृषि विभागाची पूर्व संमती घेऊन पूर्ण रक्कम अदा करुन अधिकृत विक्रेत्यांकडून औजारांची खरेदी केल्यानंतर, थेट लाभार्थी शतकऱ्यांच्या बँक खात्यावर अनुदान जमा करण्याच्या पध्दतीचा (DBT) चालू वर्षी अवलंब करण्यात आला आहे. त्याचधर्तीवर, यापूढे इतर निविष्ठा (बियाणे,जैविक खते, सुक्ष्म मुलद्रव्ये, पिक संरक्षण औषधे) शेतेकऱ्यांना पुरविण्यात येणार आहेत. सबब, स्थानिक निविष्ठांच्या साठवणूकीसाठी गोदाम बांधणीची आवश्यकता नाही.

-----------------

**अमरावती जिल्हयात वीज बिलातून एलबीटी काढून देखील**
**वाढीव वीज देयक आकारल्याबाबत**

**(८१) * १५३१७ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप:** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयात काही महिन्यापूर्वी लागू करण्यात आलेली एलबीटी वीज बिलातून हटविण्यात आली असतानाही येथील वीजबील वाढलेले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याठिकाणी वीजबिलात कपात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्हयातील अवैध गौण खनिज तस्करांकडून**
**तलाठ्यावर होणाऱ्या हल्याबाबत**

**(८२) * १४६१६ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील अवैध गौण खनिज तस्कराकडून तलाठ्यावर हल्ले होणे, खोट्या प्रकरणात अडकविणे, धमक्या देण्याच्या घटना माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयात पटवारी संघाच्यावतीने या घटनेचे निषेध करण्याकरिता एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात येवून काम बंद आंदोलन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तलाठी व इतर अधिकाऱ्यांना पोलीसांकडून योग्य सहकार्य मिळत नसल्यामुळे जिल्हयात अवैध गौण खनिज तस्करी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने तलाठ्यांना संरक्षण देण्याबाबत तसेच अवैध गौण खनिज तस्करी करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) यवतमाळ जिल्ह्यात जानेवारी, २०१६ मध्ये वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांनी तलाठी यांच्याविरुद्ध अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियमांतर्गत खोटा गुन्हा दाखल केल्याचे एक प्रकरण व वाळूचा ट्रॅक्टर तलाठी यांच्या अंगावर नेऊन त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याचे एक प्रकरण निदर्शनास आले आहे.

(२) होय.

(३) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(४) व (५) अवैध वाहतूक करणाऱ्यांनी वाळूचा ट्रॅक्टर तलाठी यांच्या अंगावर नेऊन त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी संबंधितांविरुद्ध पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियमांतर्गतच्या गुन्ह्याबाबत संबंधित तक्रारदार यांनी तपास अधिकारी यांना असा प्रकार झाला नसल्याचे लिहून दिले आहे.

जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वाहतुकीस आळा घालण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या पथकासोबत पोलिस शिपाई घेण्याबाबतच्या सूचना सर्व तहसिलदारांना दिल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात अवैधरित्या गौण खनिजाचे होत असलेले उत्खनन**

**(८३) * १५५३२ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात गौण खनिज उत्खननाला पूर्णत: बंदी असतांना मा.न्यायालयाचे आदेशाचे उल्लघंन करून आयी माटणे, आंबडगांव, कुब्रज, मोरगांव इतर गांवामध्ये गेल्या काही दिवसापासून अवैध गौण खनिज उत्खनन व या उत्खननामुळे उघड्या झालेल्या चोरी चिरेखाणी यामुळे पाळीव जनावरांसह मानवी जीवाला धोका निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार अवैध गौणखनिज उत्खनन थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यात गौण खनिज उत्खननास बंदी आहे. तथापि, गौण खनिजाच्या अवैध उत्खननाची काही प्रकरणी दृष्टीत्पत्तीस आली आहेत. दोडामार्ग तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्यासाठी पथके गठीत करण्यात आली असून, सदर पथकामार्फत जानेवारी, २०१५ ते जानेवारी, २०१६ या कालावधीत केलेल्या कारवाईत २३ प्रकरणांत रुपये ५,८६,०००/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच २५ जमीन मालकांना अवैध उत्खननाबाबत नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### हातीद (ता.सांगोला) येथील सोलापूर-कोल्हापूर महामार्गावर बस स्टॉपवर सोयी सुविधा नसल्याबाबत

**(८४) * १५३८८ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातीद (ता.सांगोला) येथील सोलापूर-कोल्हापूर महामार्गावर असलेल्या बस स्टॉपवर कोणताही निवारा नसल्यामुळे प्रवाशांना ऊन पावसात ताटकळत उभे रहावे लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी पिकशेडची उभारणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) सांगोला तालुक्यातील सोलापूर कोल्हापूर महामार्गावर हातीद येथील प्रवाशी निवारा रस्ता रुंदीकरणात पाडण्यात आला आहे. गावची लोकसंख्या व प्रवाशांची चढ उतार पहाता सदर ठिकाणी प्रवाशी निवारा आवश्यक असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधीच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत निधी प्राप्त करून घेण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### शासनाच्या गौण खनिज परवान्याकरीता असलेल्या जाचक अटी व निकष बदलण्याबाबत

**(८५) * १५७७५ श्री.आनंद ठाकूर, श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागील अनेक महिन्यापासून शासनाच्या जाचक अटीमुळे गौण खनिजा अभावी पालघर तालुक्यातील अनेक विकास कामे ठप्प असून अनेकांचा रोजगार बुडाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार विकासक व रोजंदारीवर अवलंबून असणाऱ्या मजूरांचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) सन २०१५-१६ या वर्षाकरीता महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड यांच्या शिफारशीप्रमाणे हातपाटीद्वारे उत्खननासाठी स्थानिकांना परवाने देण्याची कार्यवाही सुरु असून, पालघर व वसई येथील ५ वाळूगटांमध्ये हातपाटीद्वारे वाळू उत्खननासाठी ३१ परवाने देण्यात आले आहेत.
तसेच उपविभागीय अधिकारी पालघर व तहसिलदार यांनी पालघर तालुक्यात डबर, खडी, माती व मुरुम या गौणखनिजाचे ३३८ परवाने दिले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महावितरण कंपनी खामगांव विभागाचे दोन उप विभाग करण्याबाबत**

**(८६) * १६६२८ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महावितरण कंपनी मधील खामगांव विभागावर बुलडाणा जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा भार येत असल्यामुळे कामे रखडली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विभागाचे दोन उप विभाग करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी वारंवार मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, खामगांव विभागाचे दोन उपविभाग करण्याबाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता यांनी शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून खामगांव विभागाचे दोन उप विभाग करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.
(२) खामगांव विभागाचे विभाजन करुन नवीन मेहेकर विभाग करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, ही बाब खरी आहे.

(३) मुख्य अभियंता, अमरावती परिमंडळ, अकोला यांनी महावितरण कंपनीच्या मुख्यालयास दि. ०७.०४.२०१५ रोजी याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.
(४) नविन उपविभाग कार्यालय निर्मितीसाठी किमान ३०,००० वीज ग्राहक संख्या असणे आवश्यक आहे. म्हणजेच ज्या उपविभागीय कार्यालयांचे विभाजन करावयाचे आहे त्यामुळे उपविभागीय कार्यालयाकडे किमान ६०,००० किंवा त्यापेक्षा जास्त वीज ग्राहक संख्या असणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत खामगाव उपविभागाची ग्राहक संख्या ४५,९४२ इतकी आहे. प्रस्तावित खामगांव ग्रामीण उपविभाग-२ निर्माण करण्यासाठी ग्राहक संख्येची अट मानकांप्रमाणे पूर्ण करत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद तहसील कार्यालयाचे विभाजन करून आणखी एक नवीन तहसील कार्यालय सुरु करण्याबाबत**

**(८७) * १८०८६ श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहराचा वाढता विस्तार लक्षात घेवून सद्याच्या तहसील कार्यालयाचे विभाजन करून आणखी एक नवीन तहसील कार्यालय सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तहसील कार्यालय केव्हापासून सुरु करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) औरंगाबाद जिल्हयातील विद्यमान औरंगाबाद तहसील कार्यालयाकडे असलेले मोठया प्रमाणावरील कामकाज व तुलनेने अपूरी पडणारी अधिकारी/कर्मचारी संख्या विचारात घेवून औरंगाबाद तहसील कार्यालय बळकट करण्याच्यादृष्टीने अपर तहसिलदार, औरंगाबाद यांचे कार्यालय स्थापन करण्यास शासन निर्णय क्र. प्राफेब-२०१५/प्र.क्र. २९/म-१० दिनांक३१/१२/२०१५ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे.
(२) अपर तहसिलदार, औरंगाबाद यांचे कार्यालय दि. ९.२.२०१६ पासून सुरु करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोलतावडे, मौ.डिंभा (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथे**
**एसटी बस सेवा उपलब्ध करून देण्याबाबत**

**(८८) * १८२३९ श्री.नागो गाणार :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोलतावडे, मौ.डिंभा (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील डोंगराळ अशा दुर्गम भागामध्ये आदिवासी समाजाची वस्ती अनेक वर्षापासून वास्तव्यास असून त्यांना अतितात्काळ व दळणवळणाच्या सोयी-सुविधेकरीता घोडेगाव ते शेळकेवाडी अशी बस सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत मा.परिवहन मंत्री, जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे अनेक निवेदने दिलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने सदर ठिकाणी बस सेवा सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.

(२) व (३) राज्य परिवहन वाहतुकीस सदर मार्ग हा नव्याने असल्याने सरपंच (कोलतावडे) यांचे समवेत राज्य परिवहन वाहनांद्वारे सदर रस्त्याचे सर्व्हेक्षण केले असून त्यात तीन ठिकाणी त्रुटी आढळून आल्याने सदर त्रुटी दुर करण्याबाबत राज्य परिवहन महामंडळाद्वारा दि. २५.०२.२०१६ अन्वये सार्वजनिक बांधकाम खाते जिल्हा परिषद पुणे यांना कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नवी मुंबई येथील करावे ग्रामस्थांच्या खाडी किनारी असलेल्या**
**जमिनी बांधकाम व्यावसायिकांच्या नावे करण्यात आल्याबाबत**

**(८९) * १६३६१ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथील करावे ग्रामस्थांच्या खाडी किनारी असलेल्या जमिनी कोणताही पुरावा नसताना बांधकाम व्यावसायिकांच्या नावे करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्यां अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई करण्याबाबत तसेच करावे गावच्या ग्रामस्थांच्या जमिनी त्यांना मिळवून देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अभिलेखाची तपासणी करताना नवी मुंबई येथील करावे ग्रामस्थांच्या खाडी किनारी असलेल्या जमिनी बांधकाम व्यावसायिकांच्या नावे झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२), (३) व (४) प्रस्तुत प्रकरणी करण्यात आलेल्या चौकशीत आढळून आलेल्या अनियमिततेबाबत अभिलेखांची तपासणी करुन कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक ०३.०३.२०१६ च्या पत्रान्वये उप विभागीय अधिकारी, ठाणे व तहसिलदार, ठाणे यांना सूचना दिल्या आहेत.

-----------------

**मौजे सिरसदेवी-बेलगुडवाडी (ता.गेवराई, जि.बीड) येथील**
**११ के.व्ही. लिंक लाईन कार्यान्वित करणेबाबत**

**(९०) * १५९५० श्री.अमरसिंह पंडित, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सिरसदेवी (ता.गेवराई, जि.बीड) ३३/११ के.व्ही. उप केंद्रातुन बेलगुडवाडीकडे जाणाऱ्या ११ के.व्ही. लिंक लाईनचे काम सन २००३ मध्ये पुर्ण करण्यात येवुनही अद्याप ही लिंक लाईन कार्यान्वित करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची लिंक लाईन कार्यान्वित करून या कामी झालेल्या विलंबाची चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.ऊर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गेवराई तालुक्यातील वीज वितरणातील प्रलंबित कामाबाबत मा.ऊर्जा मंत्री यांनी दिनांक ३१ नोव्हेंबर, २०१५ रोजी मुख्य अभियंता, लातूर यांना दिलेल्या आदेशाबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली,

(४) प्रलंबित लिंक लाईन कार्यान्वित करून तालुक्यातील नविन लिंक लाईनचे काम सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

मौजे सिरसदेवी ता. गेवराई ३३/११ के.व्ही. उपकेंद्रातून बेलगुडवाडीकडे जाणाऱ्या ११ के.व्ही. लिंक लाईनचे काम सन २००३ मध्ये नसून सन २०१३ मध्ये वाहिनीचे काम पूर्ण होऊन चाचणी घेण्यात आली व ती उपकेंद्रास अद्याप पर्यंत जोडलेली नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) गेवराई तालुक्यातील उमापूर आणि तलवाडा भागातील कृषी पंपाचे विद्युतीकरण करण्यासाठी महावितरणकडून निविदा काढण्यात आली होती. परंतु, काही तांत्रिक अडचणीमुळे निविदा रद्द करण्यात आली होती व त्याच कामाकरिता फेर निविदा काढण्यात आली आहे. सदरील निविदेअंतर्गत १० रोहित्रे व पैसे भरुन प्रलंबित असलेल्या ३५० कृषीपंपाना वीज पुरवठा करण्याचे उद्दिष्टे दिलेली आहेत. तसेच, मौजे सिरसमार्ग येथे ५ MVA चे रोहित्र दि. १९.१२.२०१५ रोजी कार्यान्वित करण्यात आले असून त्याच्यावर लोड घेण्यात आला आहे. प्रशासकीय सुधारणेस्तव नविन शाखा कार्यालय चालू करण्याच्या दृष्टीने तांत्रिक पडताळणी करण्यात येत आहे.

(४) जिल्हा एकात्मिक विकास योजने (DIS) अंतर्गत ३३/११ के.व्ही. जातेगांव उपकेंद्राचे काम पुर्ण झाले असून सदरील उपकेंद्राचे काम पुर्ण झाले असून सदरील उपकेंद्राला ३३/११ के.व्ही. सिरसदेवी उपकेंद्रातून निघणारी ११ के.व्ही. जातेगांव वाहिनी नव्याने झालेल्या जातेगांव उपकेंद्राला जोडण्यात येणार असून त्यामुळे या वाहिनीसाठी सिरसदेवी उपकेंद्रातील वापरण्यात येणारा ११ के.व्ही. बे रिक्त होत असून त्यावर ११ के.व्ही. बेलगुडवाडी (लि.लाईन) जोडण्यात येणार आहे, त्यामुळे सदरील वाहिनी स्वतंत्रपणे उपकेंद्रातून कार्यान्वित होईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार व धुळे या दुष्काळग्रस्त जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी स्वाती अभय योजना लागू करण्याबाबत

**(९१) * १६११२ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.अमरिशभाई पटेल, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळग्रस्त जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी सुरु केलेली स्वाती अभययोजनेत नंदुरबार व धुळे जिल्ह्याचा समावेश करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार नंदूरबार व धुळे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी उक्त योजना लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, नंदुरबार व धुळे हे दुष्काळग्रस्त जिल्हे असूनही या जिल्ह्यांचा स्वाती अभय योजनेत समावेश न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२), (३) व (४) लातूर जिल्ह्यातील जढाळा गावातील विद्यार्थीनीने एस.टी.च्या पाससाठी पैसे नसल्याने केलेली आत्महत्येची घटना लक्षात घेवून राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर शासनाच्या कोणत्याही मदती शिवाय उत्स्फुर्तपणे फी माफीची योजना मराठवाडा विभागातील ८ जिल्ह्यासाठी राबविण्यात येत असून उर्वरित जिल्ह्यांकरीता दिनांक १०.२.२०१४ च्या शासन निर्णयांन्वये उक्त योजना राबविण्याकरीता संबंधित विभागांना राज्य परिवहन महामंडळाद्वारा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तथापि, दरम्यानच्या कालावधीत प्रवास सवलत योजना राबविण्याबाबत शासनस्तरावर धोरणात्मक बदल होऊन त्याप्रमाणे दिनांक २५.२.२०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्यानुसार राज्य परिवहन महामंडळाकडील सर्व सवलत योजनांचे पुनर्विलोकन करण्याची बाब विचाराधिन आहे.

----------------

**वाशिम येथील राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिक्षक तसेच इतर रिक्त पदे भरण्याबाबत**

**(९२) * १८३५१ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम येथील राज्य उत्पादन शुल्क विभागातील अनेक पदे रिक्त असून वाशिम येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिक्षक पदाचा अतिरिक्त कार्यभार यवतमाळ येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिक्षक यांच्याकडे सोपविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) अशास्थितीत शासनाकडून मिळणारे उद्दिष्ट पुर्ण करण्याचे मोठे आव्हान विद्यमान अधिकारी, कर्मचाऱ्यांना पेलावे लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार वाशिम येथील राज्य उत्पादन शुल्क विभागात अधिक्षक नियुक्त करण्यासोबतच येथील आवश्यक ती रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) सन २०१४-१५ मध्ये वाशिम जिल्ह्यासाठी असलेल्या रु.२.२८ कोटी इतक्या महसूल उद्दीष्टापैकी रु.२.३४ कोटी इतका महसूल जमा झाल आहे. तसेच सन २०१५-१६ मध्ये असलेल्या रु.२.०० कोटी इतक्या महसूल उद्दीष्टापैकी फेब्रुवारी, २०१६ अखेर रु.५३,८०,४५८/- इतका महसूल जमा झाला असून मार्च अखेर नुतनीकरणातून रु.१.५० कोटी इतका महसूल अपेक्षित आहे.

(३) व (४) अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, वाशिम यांच्या कार्यालयासाठी एकूण २६ मंजूर पदे आहेत. त्यापैकी अधिक्षकासह दोन निरीक्षक, एक दुय्यम निरीक्षक, एक वरीष्ठ लिपिक, एक लघुलेखक, एक सहायक दुय्यम निरीक्षक, एक जवान व दोन चपराशी याप्रमाणे एकूण १० पदे रिक्त आहेत. तसेच अधीक्षक पदाचा अतिरिक्त कार्यभार अधिक्षक, राउशु, यवतमाळ यांच्याकडे सोपविला आहे. रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील गोरेगाव (पूर्व) येथील डेअरीचे आधुनिकीकरण करण्याबाबत**

**(९३) * १५२७३ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९४९ मध्ये मुंबईतील गोरेगाव (पूर्व) येथील ३ हजार १६० एकर जमिनीवर उभारण्यात आलेली आशिया खंडातील सर्वात मोठी दुग्ध वसाहत सध्या अडचणीत सापडलेली असून तेथे अतिशय अल्पप्रमाणात दुग्ध व्यवसाय प्रक्रिया होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त डेअरीचे आधुनिकीकरण करुन ती सक्षम करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे.

शासनाने सन १९४९ मध्ये गोरेगाव पूर्व येथील ३ हजार १६० एकर जमीनीवर आरे दुग्ध वसाहती स्थापन केल्या व त्या पैकी ९.८८ एकर ४ हेक्टर जागेवर २.२० लाख लिटर प्रतिदिन क्षमतेची दुग्धशाळा उभारली आहे. सध्या तेथे प्रतिदिन १२ हजार लिटर दुधावर प्रक्रिया होत आहे.

(२) दुग्धव्यवसायातून टप्याटप्याने बाहेर पडण्याच्या शासनाच्या दिनांक ११/११/२००२ च्या धारेणामुळे दूध संकलन कमी झाले आहे. तसेच शासनाने सहकार क्षेत्राला उत्तेजन दिल्यामुळे शासनाकडील दुध हाताळणी कमी झाली आहे. चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**पालघर जिल्हयातील माहीम-वडराई मच्छिमार बंदरात मच्छिमारीसाठी गेलेल्या पाच नौकांच्या जाळी व डोलीचे पर्ससीन मच्छिमारी नौकांनी नुकसान केल्याबाबत**

**(९४) * १७५३८ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील माहीम-वडराई मच्छिमार बंदरात मच्छिमारीसाठी गेलेल्या पाच नौकांच्या जाळी व डोलीचे पर्ससीन मच्छिमारी नौकांनी दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास प्रचंड नुकसान केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत नुकसान झालेल्या मच्छिमारांकडून जिल्हाधिकारी, पालघर, मत्स्यव्यवसाय विभाग, पालघर, ठाणे, आदिकडे तक्रारी करुनही कोणतीच दखल घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार नुकसानग्रस्त मच्छिमारांना मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे. शासनास तक्रार प्राप्त झाली आहे.

(२) नाही.

(३) तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस विभागाच्या गस्तीनौकेद्वारे समुद्रात गस्त घालण्यात आली. तथापि गस्ती दरम्यान कोणतीही पर्ससीन नौका आढळून आली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सोलर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडीयाने सोलर सिस्टीम अंतर्गत ५०० मेगावॅटपर्यंत राज्यात वीज निर्मिती करण्याबाबत**

**(९५) * १५५४६ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडीयाने सोलर सिस्टीम अंतर्गत ५०० मेगावॅटपर्यंत राज्यात वीज निर्मिती करण्यासाठी निविदा काढली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सोलर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडीया किती दराने वीज खरेदी करणार आहे,

(३) असल्यास, या प्रकल्पातून राज्य शासनाला किती नफा होणार आहे याबाबतचा तपशील काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सोलर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडीया ही वीज रु.४.४३ प्रति युनीट प्रमाणे विकत घेणार आहे.

(३) या प्रकल्पातून शासनास कमीत कमी प्रति युनीट मागे रु.१.८७ प्रमाणे बचत होणार आहे.

-----------------

**परभणी तालुक्यातील शासकीय जमिनीवर झालेले अतिक्रमणाबाबत**

**(९६) * १६६७७ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी (जि.परभणी) येथील सर्व्हे नं.१४७ मधील १५०० एकर शासकीय जमिनीवर अतिक्रमण झाल्याबाबतचा अहवाल उपजिल्हाधिकारी, श्री शिंदे यांनी नायब तहसिलदार, मंडळ अधिकारी, तलाठी, नगर रचना विभाग, भुमि अभिलेख यांची नियुक्ती करून तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अतिक्रमीत जमिनीचे रेकॉर्ड तपासून सदरील जमीन शासन ताब्यात घेण्याबाबतची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, संबंधीत सर्व अतिक्रमण धारकांना नोटीसा जारी करण्यात आल्या आहेत काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) परभणी शहरातील एकुण १४७ शासकीय सर्व्हे मधील एकुण क्षेत्र १४७६.२४ एकर क्षेत्राचे चौकशी करण्यासाठी अधिकारी-कर्मचारी यांच्या पथकाची जिल्हाधिकारी, परभणी यांनी नियुक्ती केली आहे. त्यानुसार सध्या अभिलेख तपासणीचे व प्रत्यक्ष स्थळ पाहणीचे काम पथकामार्फत प्रगतीत आहे. एकूण १४७ शासकीय सर्व्हे नं. ची या प्रकरणानुषंगिक चौकशी केल्यानंतर शासकीय जमिनीवर अतिक्रमण आढळून आल्यास या अतिक्रमणांबाबत नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाहन तिकिटामध्ये अपहार प्रकरणी ठाणे परिवहन कार्यालयाने वाहक कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केल्याबाबत**

**(९७) * १५३७८ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एसटीच्या तिकिटामध्ये अपहार होत असल्याचे ठाणे परिवहन प्रशासनाच्या निदर्शनास आल्यानंतर मागील सात दिवसांमध्ये सहा वाहक कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे परिवहन सेवेत २३०० कर्मचारी असले तरी देखील आजही १८२ चालक आणि १५५ वाहकांची आवश्यकता आहे तसेच परिवहन सेवेत बस कमी असल्याने काही मार्गावर अर्ध्या-अर्ध्या तासावर बस धावत असून त्या मार्गावरील प्रवाशांची बसमध्ये गर्दी होत असते काही वेळेस त्यामुळे कॅश अधिक अथवा कमी होत असल्याने संबंधित वाहकांवर निलंबनाची कारवाई करणे योग्य नाही असे वाहकांचे मत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्य परिवहन महामंडळाच्या ठाणे विभागाने जानेवारी, २०१६ मध्ये सात दिवसात चार वाहक कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली आहे.

(२) राज्य परिवहन ठाणे विभागात चालकांची १४९९ व वाहकांची १४४७ इतकी मंजूर पदे आहेत. सध्या १४३९ चालक व १३७१ वाहक कार्यरत असून एकूण ६० चालक व ७६ वाहक यांची कमतरता आहे. राज्य परिवहन महामंडळाकडून चालक/वाहकांना अतिकालीक भत्ता देऊन राज्य परिवहन ठाणे विभागाच्या सर्व नियोजित फेऱ्या चालविल्या जातात. ठाणे विभागात जानेवारी, २०१६ मध्ये ५४७ नियते चालविण्यासाठी ६६४ बसेस उपलब्ध असल्याने अस कमतरतेमुळे फेऱ्या अर्ध्या तासाने चालविल्या जातात, हे म्हणणे असंयुक्तिक आहे.

(३) व (४) होय. राज्य परिवहन महामंडळाच्या नियमानुसार सदर वाहकांची सक्षम सुनावणी घेऊन प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन शिस्त व अपिल कार्यपध्दती अंतर्गत संबंधित कर्मचाऱ्यांना आरोपपत्र देऊन पुढील कार्यवाही राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**राज्यात अल्पवृष्टीमुळे नुकसान झालेल्या**
**शेतकऱ्यांना निधी वितरीत करण्याबाबत**

**(९८) * १६१०० श्री.बंटी पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.राहुल नार्वेकर, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १५ हजार ७४७ गावातील शेती व्यवसाय यावर्षी दुष्काळ, अल्पवृष्टीमुळे संकटात आला असल्याने या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी केंद्र शासनाने रूपये ३ हजार ५७८ कोटी निधी तर राज्य शासनाने रूपये २ हजार ५०० कोटीचा दिला असता सुमारे १४.३४ कोटी रूपयाचे वितरण झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदान शेतकऱ्यांना देण्यासाठी कोणकोणते निकष घातलेले आहेत,

(३) असल्यास, या निधीतून कापूस वगळता अन्य पिकांसाठी नुकसान भरपाई देण्यात येणार आहे, हे खरे आहे काय, असल्यास, कापूस उत्पादकास वगळण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून किती निधी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना वितरीत केला आहे तसेच, केंद्र व राज्य शासनाने दिलेल्या निधीचे पूर्ण क्षमतेने वाटप व्हावे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) राज्यातील खरीप हंगामातील हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या १५७४७ गावांना दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहिर केली आहे. शासन निर्णय २.३.२०१६ अन्वये दुष्काळ जाहीर करण्यास पात्र नसलेल्या परंतु पिक नुकसान झालेल्या औरंगाबाद, नाशिक, अमरावती व नागपूर विभागातील कापूस, अमरावती व नागपूर विभागातील सोयाबीन व नागपूर विभागातील धान पिकाच्या नुकसानी संदर्भात विशेष मदत देण्यात आलेली आहे.
(४) राज्य शासनाने रु. २५३६.०४ कोटी इतका निधी वितरीत केला आहे व उर्वरीत निधी मागणीप्रमाणे वितरीत करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुद्रांक शुल्क व नोदंणी शुल्कावर नवीन घर घेणाऱ्या ग्राहकांची फसवणूक होत असल्याबाबत

**(९९) * १५३३७ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्कावर नवीन घर घेणाऱ्या ग्राहकांची फसवणूक होत असल्याने शासनाने रिअल इस्टेट बाजाराचा अभ्यास करुन रेडीरेकनर दर निश्चित करण्याची पद्धतीत काही वर्षापासून कोणताही बदल करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रेडी रेकनर दरात सुधारणा करुन रेडी रेकनरच्या दरात दिनांक १ एप्रिल, २०१६ पासून वाढ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, सदर वाढीचे स्वरुप काय आहे व सदर वाढ करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) महाराष्ट्र मुद्रांक (मिळकतीचे वास्तव बाजारमूल्य निश्चित करणे) नियम १९९५ मध्ये सुधारणा करण्यात आली असून, त्यानुसार आता वार्षिक मूल्य दर तक्ते प्रत्येक वर्षी दिनांक १ एप्रिल रोजी निर्गमित करावयाचे आहेत.

वर्षभरात नोंदविलेल्या खरेदी-विक्री व्यवहारांच्या पृथ:करणाच्या आधारे येणारा दर, वास्तु प्रदर्शनातील दर, स्थानिक चौकशीतील दर, स्थावर व्यवसाय बाजारातील कल इत्यादीचा सारासार विचार करुन योग्य ते दर सन २०१६-२०१७ साठी प्रस्तावित करण्यात येतील.

-----------------

**राज्यातील शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याबाबत**

**(१००) * १४८१४ श्री.माणिकराव ठाकरे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकरी व लोकप्रतिनिधींनी शेतकऱ्यांचे कर्ज माफ करावे, अशी मागणी महसूल विभागाकडे वेगवेगळया निवेदनाने केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार राज्यातील शेतकऱ्यांवरील कर्ज माफीच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) कर्जमाफी संदर्भात शासनाने निर्णय घेतलेला नाही. तथापि, दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करून विविध सवलती जाहीर केल्या आहेत.

-----------------

**कल्याण-भिवंडी-ठाणे भागातील खाडी किनाऱ्यावर**
**अनाधिकृत रेती उपसा थांबविण्याबाबत**

**(१०१) * १६०८३ श्री.महादेव जानकर, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे : तारांकित प्रश्न क्रमांक १३४७१ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-भिवंडी-ठाणे भागातील खाडी किनाऱ्यावर अनाधिकृत रेती उपसा थांबविण्यासाठी ठाणे जिल्हाधिकारी यांनी दिनांक ५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास कारवाई करुन जवळपास ६७ लाखाचा मुद्देमाल जप्त केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापुर्वीही अशीच कठोर कारवाई करुन रूपये २२ कोटी मुद्देमाल जप्त करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कल्याण, भिवंडी, ठाणे खाडी किनाऱ्यांवर वारंवार अनधिकृत रेती उपसा होऊ नये तसेच, अनधिकृत रेती उपसा करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) यापूर्वी सप्टेंबर, २०१५ व डिसेंबर, २०१५ मध्ये केलेल्या कारवाईत सुमारे रुपये १८ कोटींचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

(३) व (४) उक्त प्रकरणांत संबंधित व्यक्तींविरुध्द विविध पोलिस स्टेशन मध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच खाडीकिनारी अवैध रेती उपसा होऊ नये यासाठी बंदराची तपासणी करण्यासाठी पथके स्थापन करण्यात आली असून, सदर पथकांमार्फत वेळोवेळी तपासणी करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद जिल्हयात आरटीओ व महसूल विभागामध्ये समन्वय नसल्याने अवैधरित्या वाळूची तस्करी होत असल्याबाबत**

**(१०२) * १५५५१ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हा प्रशासनाच्या आदेशानुसार वाळूची तस्करी करणाऱ्यांना चाप लावण्याकरीत आरटीओ ने पोलीसांनाही सोबत घेतले होते परंतू त्यांच्यात संगनमत असल्यामुळे एक ट्रक पळाल्याची माहिती दिनांक १२ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरात पोलीस, आरटीओ व महसूल विभागामध्ये समन्वयक नसल्याने वारंवार वाळू तस्कर पळून जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) औरंगाबाद जिल्हयात वाळूच्या अवैध उत्खनन/वाहतूकीस आळा घालण्यासाठी महसूल, परिवहन व पोलीस विभागच्या संयुक्त तपासणीसाठी पथके स्थापन करुन, ५ तपासणी नाक्यांवर दिनांक ०७/०१/२०१६ ते दिनांक १५/०१/२०१६ या कालावधीत तपासणी करण्याचे ठरविण्यात आले होते. त्याअनुषंगाने तपासणी नाका क्रमांक ५ येथे दिनांक १०/०१/२०१६ रोजीच्या तपासणीवेळी पोलीस कर्मचारी उपस्थित नसताना वाळू वाहतूक करणारा १ ट्रक पकडला होता. सदर वाहनाचे वजन करण्यासाठी नेत असताना, ट्रक मधील कर्मचाऱ्यास सदर वाहनातून जबरदस्तीने उतरवून ट्रक पळवून नेण्यात आला. त्याविरुध्द संबंधितांविरुध्द पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखान्याच्या इमारतीची झालेली दुरवस्था

**(१०३) * १५४२९ श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यात गेल्या अनेक वर्षापासून प्रशासनाच्या दुर्लक्षतेमुळे पशुवैद्यकीय दवाखान्याच्या इमारतीची अतिशय बिकट दुरवस्था झाली असल्याचे माहे, जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यामध्ये चार ठिकाणी दवाखान्याची इमारती नाही तसेच डॉक्टरांना मुक्या जनावंराना तात्काळ सुविधा देण्यासाठी राहण्याकरीता कामाच्या ठिकाणी निवास व्यवस्था नसल्यामुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असून येथील पशुवैद्यकीय दवाखाने बेदखल होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही. माळशिरस तालुक्यात जिल्हा परिषदेंतर्गत केवळ ३ पशुवैद्यकीय दवाखान्यांना स्वत:ची इमारत नाही. इतर सर्व दवाखाने स्वत:च्या इमारतीत कार्यरत आहेत. सद्यस्थितीत सदर तीनही दवाखाने ग्रामपंचायतीच्या इमारतीत कार्यरत असून, त्यांच्या मार्फत पशुपालकांना पशुवैद्यकीय सेवा पुरविण्याचे काम चालू आहे. त्यामुळे मुक्या जनावरांची व शेतकऱ्यांची गैरसोय होत नाही.

संबंधित दवाखान्याचे अधिकारी/कर्मचारी दवाखान्याचे मुख्यालयी वास्तव्यास असल्याने पशुवैद्यकीय सेवेवर प्रतिकूल परिणाम होत नाही.

(३) स्वत:ची जागा नसलेल्या ३ श्रेणी-१ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यांसाठी जागा मिळविण्यासाठी कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-------------------

## राज्य परिवहन मंडळाच्या ऑनलाईन परवाना प्रक्रियेबाबत

**(१०४) * १५२४७ श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन मंडळामार्फत नविन ऑटोरिक्षा परवाना प्रक्रिया ऑनलाईन करून राज्यभरातून अर्ज मागविण्यात आले असून आलेल्या अर्जातून काहीच व्यक्तींना ड्रॉ पध्दतीने नविन ऑटोरिक्षा परवाना देण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ऑनलाईन परवाना प्रक्रियेसोबत प्रत्येक अर्जदाराने रुपये १२० भरलेले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या अर्जदाराने नविन परवान्याकरीता रुपये १२० भरलेले आहे व ड्रॉ पध्दती मध्ये नाव आले नाही त्यांना त्यांचे भरलेले शुल्क परत करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, नविन परवान्याकरिता भरलेले शुल्क परत न करण्याची कारणे व पर्यायी उपाययोजना काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे आहे.

(२) ऑनलाईन परवाना अर्ज सोबत शुल्क रु.१००/- (विनापरवाना) व सेवाकेंद्रामार्फत अर्ज भरल्यास शुल्क रु.१२०/- (विनापरतावा) भरणे आवश्यक होते.

(३) व (४) ऑटोरिक्षा वाटपाच्या जाहिरातीमध्ये ऑनलाईन अर्ज प्रक्रिया शुल्क रु.१००/- (विनापरतावा) व सेवाकेंद्रामार्फत अर्ज भरल्यास शुल्क रु.१२०/- (विनापरतावा) असे नमूद केले होते. सदर शुल्क हे प्रक्रिया शुल्क असल्याने त्याचा परतावा देता येत नाही.

-----------------

## धुळे शहरात वीज उपकेंद्रे उभारणेबाबत

**(१०५) * १६९६९ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरात वीज उपकेंद्रे उभारणीसाठी जागेचा अडथळा निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार जागेचा अडथळा दूर करुन वीज उपकेंद्रे उभारणीसाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) सदर दोन उपकेंद्रापैकी स.नं. १२२ (क्षेत्र १ हे ६८ आर) याची महानगरपालिका, धुळे यांचे सहमतीने, भूमी अभिलेख धुळे यांचेकडून संयुक्त मोजणी करुन घेण्यात आली. तसेच, वेळोवेळी त्याबाबत पाठपुरावा करुनही मनपा प्रशासनाकडून या जागेचा आगाऊ ताबा अजूनपर्यंत देण्यात आलेला नाही. तर उर्वरित प्रकरणी स.न.४३६/१ याचा मनपा प्रशासनाचा ठराव मिळालेला असून त्या अनुषंगाने संयुक्त मोजणीचे वेळी स्थानिक लोकांनी ही जागा धार्मिक मदरसा दिल्याचे सांगून जागा देणेबाबत तीव्र विरोध दर्शविला. सबब, पर्यायी जागेचा प्रस्ताव मनपाकडे सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पीक विम्याची मुदत वाढवून सदर माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याबाबत**

**(१०६) * १४६२१ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीचा फटका बसू नये करिता रब्बी पीक विमाचा शेतकऱ्यांना चांगला फायदा होऊ शकतो परंतु कृषी विभागाच्या गलथान कारभारामुळे पीक विम्याची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचवण्यास कृषी विभाग अपयशी ठरल्यामुळे जिल्ह्यातील फक्त २३ हजार शेतकरीच पीक विमा उतरवू शकल्याची माहिती माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रब्बी पीक विम्याची मुदत दिनांक ३१ डिसेंबर २०१५ पर्यत असल्याची माहिती कृषी विभागाने शेतकऱ्याला दिली नसल्याने परिणामी जिल्ह्यातील ७८ हजार शेतकरी या पीक विम्यापासून वंचित राहिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पीक विम्याची माहिती शेतकऱ्यांपर्यंत न पोहोचविणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर पीक विम्याची मुदत वाढविण्याबाबत तसेच, उक्त माहिती शेतकऱ्यांपर्यत पोहोचविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय कृषि विमा योजनेंतर्गत रब्बी हंगाम २०१५-१६ मध्ये यवतमाळ जिल्हयातील एकूण ३८९४५ शेतकऱ्यांनी रु.९०.७९ लाख विमा हप्ता भरुन ३२२८८ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित केलेले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) राष्ट्रीय कृषी विमा योजनेंतर्गत जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे यासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यवतमाळ यांचे मार्फत वर्तमानपत्र/घडीपत्रिका इत्यादीद्वारे प्रचार प्रसिध्दी करण्यात आली होती. त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीच्या सभा वेळोवेळी घेवून योजनेच्या अंमलबजावणीबाबत क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना सुचना देण्यात आलेल्या होत्या.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अमरावती जिल्हयात मत्स्यव्यवसायीकांना प्रशिक्षण देण्याबाबत**

**(१०७) * १५५४१ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयात २३१ सिंचन पाझर तलाव असून यामध्ये मत्स्य व्यवसाय करण्यासाठी शासनाने जिल्हा निधीतून रूपये ८ कोटीची तरतूद केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मत्स्यव्यवसाय करण्यासाठी प्रशिक्षण घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**इंदापूर तालुक्यात (जि.पुणे) भीमा व निरा या नद्यांच्या काठावरील निमसाखर, निरवांगी व खोरोची येथे अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत**

**(१०८) * १५३९२ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इंदापूर तालुक्यात (जि.पुणे) भीमा व निरा या नद्यांच्या काठावरील निमसाखर, निरवांगी व खोरोची येथे जेसीबीच्या सहाय्याने रात्री बेसुमार अवैद्य वाळू उपसा होत असल्याचे दिनांक २६ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अवैद्य वाळू उपसा रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) इंदापूर तालुक्यातील भिमा नदीपात्रातील उजनी जलाशयामध्ये वाळूचा अवैध उपसा होत असल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र निरा नदीपात्रामध्ये अशी बाब निदर्शनास आलेेली नाही.
(२) व (३) उपविभागीय अधिकारी बारामती व तहसिलदार इंदापूर यांनी उजनी जलाशयातील वाळूच्या अवैध उत्खननाबाबत डिसेंबर, २०१५ व जानेवारी, २०१६ मध्ये चार वेळा केलेल्या कारवाईत एकूण ५० बोटी पकडण्यात आल्या. सदर कारवाईमुळे भिमा नदीपात्रामध्ये अवैध उत्खनन बंद आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**डहाणू तालुक्यात (जि.पालघर) स्टॅम्प व बॉण्ड पेपर केंद्र सुरु करण्याबाबत**

**(१०९) * १५७८० श्री.आनंद ठाकूर, श्री.रामराव वडकुते, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.राहुल नार्वेकर : तारांकित प्रश्न क्रमांक १३९५६ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू तालुक्यातील ८५ ग्रामपंचायती, १७४ महसूल गावे असून तेथील हजारो लोकांना दैनंदिन शासकीय कामासाठी स्टॅम्प पेपरचा पुरवठा अत्यंत अपुरा होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डहाणू तालुक्यात स्टॅम्प व बॉण्ड पेपर केंद्र सुरु करण्याबाबत स्थानिक आदिवासी नागरिकांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार उक्त तालुक्यात स्टॅम्प व बॉण्ड पेपर केंद्र सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापि, उपकोषागार अधिकारी, डहाणू यांच्याकडे व डहाणूमधील शासन मान्य मुद्रांक विक्रेता यांचेकडे सर्व प्रकारच्या मुद्रांकाचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचा अहवाल प्राप्त आहे. तसेच मागणीनुसार मुद्रांक उपलब्ध करुन देण्याबाबतच सूचना शासनमान्य मुद्रांक विक्रेता यांना देण्यात आल्या आहेत. शासनाच्या ग्रास प्रणालीद्वारे इ-एसबीटीआर व इ-चलन या माध्यमातून ऑनलाईन मुद्रांक शुल्क व नोंदणी फी चा भरणा चोवीस तास करण्याची सुविधा नागरिकांना सर्वत्र उपलब्ध आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे लाखनवाडा (ता.खामगाव, जि.बुलडाणा) येथे**
**नवीन बस स्थानक उभारण्याबाबत**

**(११०) *१६६३० श्री. पांडुरंग पुंडलिक फुंडकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे लाखनवाडा (ता.खामगाव, जि.बुलडाणा) येथील मोठ्या प्रमाणावरील ये-जा करणाऱ्या प्रवाश्यांची व विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेता सोयीसाठी वारंवार बसस्थानकाची मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एस टी महामंडळाने मौजे लाखनवाडा येथे प्रवाशांच्या सोयीसाठी सदर मागणीच्या अनुषंगाने नवीन बसस्थानक स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, तद्नुसार मौजे लाखनवाडा (ता.खामगाव, जि.बुलडाणा) येथे नवीन बस स्थानक उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.

(२) मौजे लाखनवाडा येथे बसस्थानक बांधण्यासाठी मागणी राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर प्राप्त नसल्याने सदरील ठिकाणी नविन बसस्थानक करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली नाही. तथापि, प्रवासी सुविधा विचारात घेवून मौजे लाखनवाडा (ता.खामगांव, जि. बुलडाणा) येथे राज्य परिवहन महामंडळामार्फत ४०x१० फुट आकाराचा प्रवासी मार्ग निवारा बांधण्यात आलेला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.